म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २७९२
१९८२

# रंगीता

संपादक

जवाहर मुथा | यशवन्त भिमाले

REFBK-0018593
REFBK-0018593

आनंदवन प्रकाशन

REFBK-0018593
REFBK-0018593

# स रि ता

[ प्रातिनिधिक कवितांचा संग्रह ]

संपादक

**प्रा. जवाहर मुथा,**
एम्. ए. ( हिंदी ), एम्. ए. ( मराठी )

**प्रा. यशवंत भिमाले,**
एम्. ए.

**आ नं द व न प्र का श न, मुं ब ई**

प्रकाशक :
गो. म. किराणे
आनंदवन प्रकाशन,
माहीम, मुंबई १६

© प्रकाशकाचे स्वाधीन

चित्रकार : श्री. गो. पारनाईक, ठाणे

दिनांक : १७ ऑक्टोबर
विजयादशमी, १९७२

किंमत : चार रुपये

मुद्रक :
प्रभाकर सिद्ध
साधना प्रेस,
४३०-३१ शनिवार पेठ, पुणे ३०

**डॉ. रा. शं. वाळिंबे**

**यांना—**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७९८६६ वि: काव्य
2993 नों. दि: 2.2.603

# प्रस्तावना

दिवसेंदिवस मराठी कवितेचे स्वरूप बदलत आहे. हे स्वरूप अंतर्बाह्य बदलत आहे. आशयघनता आणि रचनासौंदर्य या दोन्ही बाबतींत आधुनिक मराठी कविता चिंतनशील झालेली वाटते. विषयांच्या चौकटी, अनुभूतींच्या प्रमाणात वाढतच आहेत. आविष्कारांमधील चैतन्य किंवा अपरिहार्यता यांमधील साचेबंदपणा ढासळू लागला आहे; परंपरेचे हवामान मराठी कवितेला अस्वस्थ करून सोडीत आहे; व त्यातूनच अनेक प्रकारचे उद्रेक व आवेग शब्दांतील गहन अर्थाबरोबर बाहेर पडत आहेत. आणि म्हणूनच टीकाकारांना अनेक समस्या भेडसावू लागल्या आहेत. मराठी कवितेचे स्वरूप कोणते, आधुनिक मराठी कविता एखाद्या खंदकात जाऊन कोसळणार तर नाही ना, तिचे अस्तित्वच आपण मानावयाचे का भाववादी कवितेलाच डोक्यावर घ्यायचे, इ. नानाविध प्रश्न आज टीकाकारांसमोर आहेत. परंतु आजची ही मराठी कविता संक्रमणावस्थेत असताना अशा प्रकारचे अनेक प्रश्न उद्‌भवले नाहीत तरच नवल मानावयाचे !

मग अशा या स्थितीत प्रस्तुत ‘ सरिता ’चे महत्त्व काय ?– असाही प्रश्न सहज समोर यावा !– नव्हे ते स्वाभाविकच आहे. ‘ सरिता ’ हा मराठी कवितेचा प्रामाणिक आलेख आहे. ज्ञानेश्वरांपूर्वीपासूनची मराठी कविता तो नारायण सुर्वे-पर्यंतच्या मराठी कवितेचा हा धावता, महत्त्वाचे टप्पे घेऊन पूर्णत्वाकडे जाणारा, ओघवत्या प्रवाहाचा हेतुपूर्वक प्रवास आहे. समग्र मराठी कवितेचा इतिहास व भविष्यकाळ लक्षात घेऊन साधलेल्या दूरदृष्टीचा वर्तमानकालीन ‘ ताम्रपट ’ आहे. संपूर्ण मराठी कवितेच्या समन्वयाचा अत्याधुनिक आविष्कार आहे ! आणि म्हणूनच ‘ सरिते ’चे महत्त्व बहुमोल असेच ठरावे !

मराठी ग्रंथरचनेची सुरुवात सातव्या आठव्या शतकात झाली. तोपर्यंत मराठी भाषा ही निव्वळ बोलण्यात होती. मराठीतील ग्रंथरचनेचा आद्य मान महानुभावीय पंथातील कवींच्याकडे जातो. चक्रधरांचे ‘ लीळाचरित्रा ’पासून तो ज्ञानेश्वरापर्यंतच्या काळापर्यंतच महानुभावीय वाङ्मयाचा अंतर्भाव मराठी भाषेत

होतो. त्यानंतर साधारणतः तीन कालखंडांत १८१८ पर्यंतचे मराठी साहित्य विभागले जाते. पहिला कालखंड हा संत-कवींचा ! ज्ञानेश्वरापासून तुकाराम-रामदासापर्यंतचे वाङ्मय यात समाविष्ट होते. दुसरा कालखंड हा पंत-कवींचा ! वामन-मोरोपंतांच्या पंडिती काव्याचा आविष्कार या काळात झालेला दिसतो ! तर तिसरा कालखंड हा तंत-कवींचा !– म्हणजेच शाहिरी वाङ्मयाचा होय ! अमिनदास या शाहिराने 'अफझलखानाचा वध' नावाचा पहिला कडाका (म्हणजेच पोवाडा) रचलेला आढळतो. इ. स. १६५९ च्या सुमारास या पोवाड्याची निर्मिती झाली असली तरी नामांकित असे शाहिरी वाङ्मय इ. स. १७६० ते १८४० च्या दरम्यान निर्माण झाले. राम जोशी, अनंत फंदी, गंगू हैबती, होनाजी बाळा, प्रभाकर, सगनभाऊ, परशुराम असे एकापेक्षा एक दर्जेदार शाहीर या काळात झाले व त्यांनी मराठीतील पोवाडे–लावण्यांचा भाग समृद्ध करून ठेवला. संत-साहित्याने महाराष्ट्राला अध्यात्माची व निवृत्तीची शिकवण दिली, तंतांनी कथा-पुराणिकांच्या द्वारे मराठी साहित्याला नवा तजेला दिला, तर पंतांनी मराठी साहित्याच्या नव्या रूपाला शोभेल असा पोवाड्या–लावण्यांचा मराठमोळा साज चढविला.

इ. स. १८१८ च्या राज्यक्रांतीनंतर मराठी साहित्यातही आमूलाग्र असे बदल घडून येऊ लागले. विठोबा अण्णा दप्तरदार, कृष्णशास्त्री चिपळूणकर, परशुराम तात्या गोडबोले, कृष्णशास्त्री राजवाडे वगैरेंनी संस्कृत काव्यांची निव्वळ मराठी भाषांतरे केली. या दोघांच्या समकालीन अशी स्वतंत्र मराठी कविताही त्या वेळी अवतरत होती. पण या स्वतंत्र कवितेला विषयाच्या चौकटी होत्या. 'राजा शिवाजी' हे महादेव मोरेश्वर कुंटे यांचे काव्य मराठीतले पहिले स्वतंत्र काव्य मानले जाते. जे काव्याच्या बाबतीत तेच थोडेफार गद्याच्याही बाबतीत घडले असे मानावे लागेल.

१८७५ मध्ये मराठी कवितेला विलक्षण प्रत्ययकारी वळण लावले ते केशवसुतांनी ! त्यांनी एकूण १३२ कविता लिहिल्या. त्यांतील सुरुवातीच्या काही कविता या इंग्रजी कवितांची भाषांतरे होती. पण नंतरच्या कवितांमधून आशय आणि अभिव्यक्तीच्या पद्धतीत त्यांनी केलेली अभूतपूर्व स्वरूपाची क्रांती ही वादातीत आहे. केशवसुतांनी प्रथमच मराठीत सुनीत-रचना केली, गूढगुंजनाचा प्रवाह आणून सोडला, आणि सामाजिक प्रश्नांना मराठी कवितेत अधिष्ठान मिळवून दिले ! केशवसुतांनंतर ना. वा. टिळक, विनायक, बालकवी, बी, दत्त,

माधवानुज वगैरे अनेक कवींपर्यंत हा संप्रदाय टिकून होता. मानवतावादी, समतावादी, व्यक्तिवादी अशी ही मराठी कविता १९२० पर्यंत टिकून होती. निसर्गपर, प्रीतिपर आणि कल्पनामय कवितेची ही भरारी १९२३ मध्ये रविकिरण मंडळाच्या निर्मितीस कारणीभूत ठरली! त्यानंतरच्या दीडदशकावर या मंडळातील कवींचा प्रभाव सलगपणे होता. माधव ज्यूलिअन्, गिरीश, यशवंत, श्री. बा. रानडे, सौ. मनोरमाबाई रानडे, ग. त्र्यं. माडखोलकर, द. ल. गोखले व दिवाकर हे या मंडळाच्या स्थापनेच्या वेळचे सदस्य होते. या कवींनी आपापल्या स्वभाव-गुणधर्मानुसार व प्रतिभालंकृत शक्तीनुसार मराठी कवितेला ऊर्जितावस्था प्राप्त करून दिली. प्रेम या भावनेचे साध्या, सुबोध व नैसर्गिक रीतीने आविष्कार करून माधव ज्यूलियनांनी त्या भावनेस मराठी कवितेत प्रतिष्ठा मिळवून दिली. गिरीशांनी आपल्या खंडकाव्यातून सफाईदार रचना व संयत भावनेचा नवा आविष्कार घडविला, तर कमालीच्या आत्मपर प्रतिभेतून यशवंतांनी सरस उत्कटतावादी कवितेची निर्मिती केली! याच काळातील थोडे सुरुवातीचे कवी भा. रा. तांबे! त्यांच्या व्यक्तिगत जीवनातली मुख्य व प्रभावी भावना सफल प्रीतीची! त्या भावनेतून निर्माण झालेल्या कवितांनी मधुरतेचा जणू उच्चांकच प्रस्थापित करून ठेवला. त्यांच्या एकूण २२५ कविता, रा. श्री. जोगांनी संपादित केलेल्या 'समग्र कवितां'त आहेत; त्या व अगदी अलीकडे १९७२ मध्ये प्रा. जवाहर मुथांनी त्यांच्या शोधून काढलेल्या तीन महत्त्वपूर्ण कवितांकडे पाहता त्यांतील रसरशीतपणा किती जिवंत आहे, याचा सहज प्रत्यय येतो. त्याशिवाय दुसरीकडे राष्ट्रीय व ऐतिहासिक कवितेची निर्मिती कवी गोविंद, दु. आ. तिवारी, अज्ञातवासी, कवी माधव, साने गुरुजी, इ. कवींकडून होत होती. वीर सावरकर आणि कवी गोविंद यांच्या राष्ट्रीय कवितेतून दिसून येणारे देदिप्यमान तेज इतर कवितांहून वेगळे व आगळे म्हणूनच उठून दिसणारे आहे. या राष्ट्रीय कवितांप्रमाणेच १९२५ ते १९४० या काळात जानपदगीते, विनोदी व विडंबनात्मक कविता, शिशुगीते असे विविध काव्यप्रकार उदयास आले. जानपदगीतांत चंद्रशेखर, ग. ल. ठोकळ, ग. ह. पाटील, वि. भि. कोलते, ना. घ. देशपांडे, के. नारखेडे, वगैरे कवींनी भरीव कामगिरी केली. विडंबनात्मक कवितेला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे श्रेय आचार्य प्र. के. अत्रेंच्या 'झेंडूची फुले' या काव्यसंग्रहालाच दिले पाहिजे.

१९३० च्या सुमारास मराठी कविता वास्तववादाकडे झुकू लागल्याचे दिसून येते. पु. शि. रेगे यांचा कवितासंग्रह 'साधना व इतर कविता' १९३१ मध्ये प्रकाशित झाला. १९३२ मध्ये कवी अनिलांचा 'फुलवात', १९३३ मध्ये कुसुमाग्रजांचा 'जीवनलहरी', हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले, व त्यानंतर मराठी कविता अपारदर्शक बदलू लागली. बा. सी. मर्ढेकरांच्या 'शिशिरागमा' नंतर (१९३८) मराठी कवितेचे स्वरूप पालटू लागले. मानवतेची जी दारुण व निर्दय विटंबना दुसऱ्या महायुद्धानंतर झाली व यंत्रयुगाच्या अवताराने मानवी जीवनात जी नीरसता व कृत्रिमता निर्माण झाली, त्या सर्वांविषयीची आत्यंतिक चीड मर्ढेकरांच्या कवितांतून बाहेर पडली. मुक्तछंदाचा व विषयवैचित्र्याचा वास्तववादी नवा आविष्कार यामधून उदयास आला. विफलतावादामध्ये गुंतून पडलेली मानवी मने यातून डोकावू लागली. या सर्वांच्या परिणामाने आधुनिक मराठी कविता एकांतिक बनली. मर्ढेकरांची वैफल्यपूर्ण वास्तववादी कविता, कुसुमाग्रजांची ध्येयनिष्ठ जीवनवादी कविता, बा. भ. बोरकरांची सौंदर्यासक्त भाववादी कविता, मंगेश पाडगावकर व इंदिरा संतांची निसर्गप्रतिमाधिष्ठित प्रेमवादी कविता, विंदा करंदीकरांची उत्साहप्रेरक क्रान्तदर्शी कविता, बाबा आमट्यांची चिंतनशील कृतीपर कविता, वसंत बापट व नारायण सुर्व्यांची प्रगतिशील समाजाभिमुख कविता, आणि शांता शेळके, सरिता पदकी, पद्मा गोळे यांची प्रीतीच्या माध्यमातून प्रकट झालेली तरल कविता;– अशा प्रकारची नानाविध रूपे मराठी कवितेने घेतली.

मराठी काव्यरूपी 'सरिते'चा प्रवाह हा असा सक्षम आहे. त्याचे मनोहारी दर्शन या 'सरिता' काव्यसंग्रहात घडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे. हे करताना आधुनिक मराठी कवितेच्या अंतःप्रवाहांनाच प्रामुख्याने स्थान दिले गेलेले आहे, याचीही प्रामाणिक जाण आमच्या मनाला आहे. मराठी कवितेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना इतिहासापेक्षा वर्तमानकाळाकडे अवधान देणे महत्त्वाचे आहे, असे आम्हांला वाटते! कारण त्यातूनच पुढे भविष्यकालीन कविता आकारणार असते! मराठी कवितेला त्या युगनिर्मात्या कवीची प्रतीक्षा नाही,– असे म्हणावे तरी कसे?

या प्रवासात मराठी कविता आधुनिक काळामध्ये अनेक वळणे वगैरे घेत आहे. अनियतकालिकांचे प्रकाशन व दलित साहित्य, हे त्यातलेच काही प्रकार!

अनियतकालिकांमधून प्रकाशित झालेले व होत असलेले सर्वच मराठी वाङ्मय टाकाऊ आहे असे म्हणणे आत्मघाताचे होईल. त्यातील किती तरी चांगल्या कविता लक्षात राहण्याइतक्या महत्त्वाच्या अशा अर्थाने परिपूर्ण आहेत. भालचंद्र नेमाडे ( ' कोसला 'कार ), अशोक शहाणे, प्रकाश कामतीकर, चंद्रकांत खोत, अनिल बांदेकर, सतीश काळसेकर, इ. चे साहित्य या बाबतीत निश्चितच वेगवान ठरले आहे. अनियतकालिकांच्या बाबतीत होणारे काही नवनवीन प्रयोगही लक्षणीय आहेत. अंतर्देशीय पत्रावर छापले गेलेले ' स. न. वि. वि. ' ( जालना, औरंगाबाद ) व पोस्टकार्डावर छापले गेलेले ' शेज ' ( SHEJ ) ही त्या त्या बाबतीतली पहिली अनियतकालिके होत ! सध्या ' लहर ' नावाचे अनियतकालिक तर प्रतिवर्षी एकदा पोस्टकार्डावर धुळ्याहून छापले जाते.

दलित साहित्यामधून बाबूराव बागूल, दया पवार, श्रीधर शनवारे, वगैरेंच्या कादंबऱ्या-कवितांची दखल मराठी साहित्याला घेणे अपरिहार्य आहे !

मराठीतील प्रातिनिधिक अशा कवितांचा संग्रह प्रकाशित करताना विचार करणे आवश्यक आहे तो या ठिकाणी शिकस्तीने करण्याचा आम्ही प्रयत्न केलेला आहे ! पृष्ठसंख्येची मर्यादा व वेळेवर संमती न आल्यामुळे इच्छा असून देखील काही रचना समाविष्ट करता आल्या नाहीत. हे करताना अनेकांचे सहकार्य आम्हांला लाभले. या संग्रहाचे प्रकाशक श्री. गो. म. किराणे यांनी स्वतः पुढे होऊन आम्हांला प्रोत्साहन दिले. मुद्रक श्री. प्रभाकर सिद्ध यांनी तत्परतेने उत्कृष्ट मुद्रण करून दिले. चित्रकार श्री. श्री. गो. पारनाईक व प्रा. रामचंद्र देशपांडे ( कृषी महाविद्यालय, कोल्हापूर ) यांच्याही सक्रिय सहकार्याची नोंद घेणे इष्ट ठरेल ! या सर्वांचे आभार मानावे, तितके थोडेच आहेत ! डॉ. टी. के. टी. आचार्य ( अध्यक्ष, विद्याभ्यास मंडळ, म. फुले कृषी विद्यापीठ ), यांनी आम्हांस दिलेले उत्तेजन तर आदर्शवत् ठरावे ! संग्रहात समाविष्ट केलेल्या कवींनी अगदी तत्परतेने योग्य ती संमती देऊन तांत्रिक अडथळा दूर केला. या सगळ्यांचे मनःपूर्वक आभार.

१६–१०–७२.

—प्राध्यापक **जवाहर मुथा**

## अनुक्रमणिका


| कविता | कवीचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| १. गुरुमहिमा | मुकुंदराज | ९ |
| २. पैल तो गे | ज्ञानेश्वर | १० |
| पसायदान | ज्ञानेश्वर | ११ |
| ३. तूं माझी माऊली | नामदेव | १२ |
| पतितपावन | नामदेव | १३ |
| ४. अभंग | तुकाराम | १४ |
| ५. दोन अभंग | जनाबाई | १५ |
| ६. केकावली | मोरोपंत | १६ |
| ७. मला जन्म हा | रामजोशी | १८ |
| ८. घनःश्याम सुंदरा | होनाजी बाळा | १९ |
| ९. निर्मिकाचे अखंड | महात्मा फुले | २१ |
| १०. पर्जन्याप्रत | केशवसुत | २२ |
| ११. मी | बालकवी | २३ |
| १२. एखाद्याचे नशीब | गोविंदाग्रज | २४ |
| १३. नकोस देऊ... | भा. रा. तांबे | २५ |
| १४. सुंदर हिरवे माळ ! | गिरीश | २६ |

| कविता | कवीचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| १५. सरितेचे चरित्र | यशवन्त | २८ |
| १६. अश्रू ! | साने गुरुजी | ३० |
| १७. जात्यावरलं गाणं | ग. ल. ठोकळ | ३२ |
| १८. मन | बहिणाबाई चौधरी | ३४ |
| १९. आत्मबल | वि. दा. सावरकर | ३६ |
| २०. तहान | अनिल | ३७ |
| २१. प्रीतीसाठी प्रीती | कुसुमाग्रज | ३९ |
| २२. झाडं पानात येतात | पु. शि. रेगे | ४० |
| २३. हिरवळ आणिक पाणी | बा. भ. बोरकर | ४१ |
| २४. बाभूळ | ग. ह. पाटील | ४२ |
| २५. श्रावण येतो आहे | ग. दि. माडगूळकर | ४४ |
| २६. मी न माझा राहिलो ! | मनमोहन | ४५ |
| २७. दुवा | शांता ज. शेळके | ४७ |
| २८. एका पावसाळ्यात | शिरीष पै | ४८ |
| २९. मानवांनो आत या रे | विंदा करंदीकर | ४९ |
| ३०. ही निळी पांढरी | इंदिरा संत | ५० |

| कविता | कवीचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| ३१. चिरवसन्ताचे वैभव | बाबा आमटे | ५२ |
| ३२. बरेच दिवस | मंगेश पाडगावकर | ५४ |
| ३३. श्रावण | सरिता पदकी | ५६ |
| ३४. महाराष्ट्र उन्मेषशाली | प्रफुल्ल दत्त | ५७ |
| ३५. माहेर | यशवन्त भिमाले | ५८ |
| ३६. मेघ माझ्या अन्तरीचे | गोपाळ किराणे | ५९ |
| ३७. माझ्या स्वप्नी | वसंत बापट | ६० |
| ३८. दोन कविता | मधुकर केचे | ६२ |
| ३९. पाखरांचे गीत | जवाहर मुथा | ६४ |
| ४०. आता मजेने बोलतो | सुरेश भट | ६५ |
| ४१. माझे शब्द | नारायण सुर्वे | ६६ |
| ४२. दर्शनबधिरा | पद्मा गोळे | ६७ |
| ४३. निरोप | विद्या परचुरे | ६८ |
| ४४. सरितेचे विरहगीत | दत्तप्रसन्न कारखानीस | ६९ |
| ४५. घाई लाजऱ्या उषेची ! | विजय सुराणा | ७० |
| ४६. शेत जांभळे | वसंत दीक्षित | ७१ |

## १. गुरुमहिमा : मुकुंदराज

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९८५९३
शाखा (स्थळ प्रत)

माझिये मतीचा विस्तारु। तो अति मंद तरु।
राम महिमा अपारु। मज केवीं वर्णवे ॥ १ ॥

सूर्य बाह्य तम निरशे। परी अंतरीचें न प्रकाशे।
तें अज्ञानतम आपैसें। फिटे गुरुप्रसादे ॥ २ ॥

न पडे वेदशास्त्रांचा पांगु। अभ्यासाव नलगे अष्टाङ्ग योगु।
जरी पाविजे राजयोगु। श्रीगुरुप्रसादे ॥ ३ ॥

तपातीर्थांचे डांगोरे। आणिक श्रुतीस्मृतींचे कामारे।
तयाचे न उतरे अज्ञान कावरें। येके ज्ञानेंवीण ॥ ४ ॥

तें स्वानुभवज्ञान। न पवीजे श्रीगुरुवीण।
म्हणौनि तेथींचें महिमान। तें अगाध असे ॥ ५ ॥

असो हे बोबडा बोली। कांहीं येक गुरुस्तीती केली।
ते प्रीति पावली। श्रीगुरुपरंपरा ॥ ६ ॥

मज चतुरदेशी न जोडे। म्हणौनि बोलीले बोबडे।
जैसे उंसु कां वांकोडें। महा रसाळ ॥ ७ ॥

हो कां कस्तुरी काळी। ते परिमळें आगळी।
तैसें आरुष बोल परी नव्हाळी। भेटे परमसुखाची ॥ ८ ॥

इयें ग्रंथीचें हेंचि चातुर्य। जें रोकडें स्वानुभवसौंदर्य।
म्हणौनि सेवीतु मुनिवर्य। विवेकसिंधु हा ॥ ९ ॥

## २. पैल तो गे : ज्ञानेश्वर

पैल तो गे काऊ कोकताहे।
शकुन गे माये सांगताहे ॥ ध्रु. ॥

उड रे उड रे काऊ। तुझे सोनेनि मढविन पाऊ।
पाहुणे पंढरी राऊ। घरा कैं येती ॥

दहीभाताची हंडी। लावीन तुझे तोंडीं।
जीवा पढिये तयाची गोडी। सांग वेगी ॥

दूधें भरुनी वाटी। लावीन तुझे ओठीं।
सत्य सांगें गोठी। विठो येईल काई ॥

आंबेया डाहाळीं। फळें चुंबीं रसाळीं।
आजीचे रे काळीं। शकुन सांगें ॥

ज्ञानदेवो म्हणे। जाणिजे खुणे।
भेटति पंढरिराणे। शकुन सांगें ॥

* * *

# पसायदान : ज्ञानेश्वर

आतां विश्वात्मकें देवें। एणें वाग्यज्ञें तोषावें
तोषोनि मज द्यावें। पसायदान हें ॥ १ ॥

जे खलांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रति वाढो
भूतां परस्परें पडो। मैत्र जीवाचें ॥ २ ॥

दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्यें पाहो।
जो जे वांछील तो तें लाहो। प्राणिजात ॥ ३ ॥

चलां कल्पतरूंचे आरव। चेतना चिंतामणींचें गांव।
बोलते जे अर्णव। पीयूषांचे ॥ ४ ॥

चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन।
ते सर्वांही सदा सज्जन। सोयरे होतु ॥ ५ ॥

## ३. तूं माझी माऊली : नामदेव

तूं माझी माऊली । मी वो तुझा कान्हा ।
पाजीं प्रेम पान्हा । पांडुरंगे ॥ १ ॥

तूं माझी गाऊली । मी तुझें वासरू
नको पान्हा चोरूं । पांडुरंगे ॥ २ ॥

तूं माझी हरिणी । मी तुझे पाडस ।
नको तोडू आस । पांडुरंगे ॥ ३ ॥

तूं माझी पक्षिणी । मी तुझे अंडज ।
चारा घाली मज । पांडुरंगे ॥ ४ ॥

कासवीची दृष्टी । सदा बाळावरी ।
तसी दया करी । पांडुरंगे ॥ ५ ॥

नामा म्हणे विठो । भक्तिच्या वल्लभा ।
ठाव आम्हा द्यावा । चरणांपासी ॥ ६ ॥

* * *

## पतितपावन : नामदेव

पतितपावन नाम ऐकुनी आलो मी द्वारा
पतितपावन न होसि म्हणुनी जातों माघारा ॥ ध्रु. ॥

सोडी देवा ब्रीद आता न होसि अभिमानी
पतितपावन नाम तुजला ठेवियलें कोणी ॥

घेसी तेव्हां देसी ऐसा अससी उदार
काय देवा रोधूं तुमचें कृपणाचें द्वार ॥

उच्छिष्टाचें सीत न देवा टाकिसि बाहेरी
कोणी दिधलि भगवंत तुजला भूषणाचि थोरी ॥

नामा म्हणे बा ! तुमचें नलगे मज कांहीं
प्रेम असों द्या, हृदयी तुमचे आठवीन पाय ॥

## ४. अभंग : तुकाराम

कवणाचें घर। कवणाचें द्वार
सोडोनी संसार। जाणे लागे ॥ १ ॥

जाणे लागे अंती। येकला येकट
व्यर्थ खटपट। जन्मवरी ॥ २ ॥

जन्मवरी जाण। संसारीं गोविलें।
नाही कांहीं केलें। आत्महित ॥ ३ ॥

आत्महित गेलें। संसाराचे ओढी।
अंतीं कोण सोडी। रामावीण ॥ ४ ॥

घातकचि आहे। लोकांचा तो संग
म्हणोनी नि:संग। तुका राहे ॥ ५ ॥

* * *

जे का रंजले गांजले। त्यासि म्हणे जो आपुले ॥
तोचि साधु ओळखावा। देव तेथेंचि जाणावा ॥
मृदु सबाह्य नवनीत। तैसें सज्जनाचें चित्त ॥
ज्यासि आपंगिता नाही। त्यासि धरी जो हृदयीं ॥
दया करणें जे पुत्रासी। तेची दासा आणि दासी ॥
तुका म्हणे सांगो किती। तोचि भगवंताची मूर्ती ॥

## ५. दोन अभंग : जनाबाई

पक्षी जाय दिगंतरा । बाळकांसी आणी चारा ॥
घार हिंडते आकाशीं । झांप घाली पिल्लापाशीं ॥
माता गुंतली कामासीं । चित्त तिचे बाळापाशीं ॥
वानर हिंडे झाडावरी । पिलीं बांधुनिया उदरीं ॥
तैसीं आम्हांसीं विठ्ठलमाये । जनी वेळोवेळा पाहे ॥

* * *

आंधळ्याची काठी । आडकली कवणे बोटीं ॥
माझिये हरिणी । गुंतलीस कोणे रानीं ॥
मुकें मी पाडस । चुकलें भोवें पाहें वास ॥
तुजवीण काय करूं । प्राण किती कंठीं धरूं ॥
आता जीव जाऊं पाहे । धांव घाली माझे आये ॥
माझी भेटवा जननी । संतां विनवी दासी जनी ॥

## ६. केकावली : मोरोपंत

तुझ्या बहुत शोधिले अघ-निधी पदाच्या रजें ।
न तें अनृत वर्णिती बुध जनीं सदाचार जें ।
असें सतत ऐकते सतत बोलते मीच ते– ।
प्रमाण न म्हणो जरी उचित माझिया नीचते ॥ १ ॥

तसाचि उरलों कसा ? पतित मी नसें काय ? कीं– ।
कृपाचि सरली ? असेंहि न घडे जगन्नायकीं, ।
नसेन दिसलों कसा ? नयन सर्वसाक्षी रवि; ।
विषाद धरिला, म्हणों ? न सुरभी विष, क्षीर वी ॥ २ ॥

अगा प्रणतवत्सला ! म्हणति त्या जनां पावलां, ।
म्हणून तुमच्याच मी स्मरतसें सदा पावलां; ।
'करूं वरि कृपा, हरूं व्यसन, दीन हा तापला',– ।
असें मनिं धरा; खरा भरवसा मला आपला ॥ ३ ॥

असो वरि कसा तरी, विमल भाव ज्याचा करा ।
तयावरि दया; पचे वर असाचि द्या चाकरा; ।
वृथाचि गमतें दिलें, बहुहि, जें न दासा जिरे, ।
पुसोनि अधिकार द्या; सुकर तें सदा साजिरें ॥ ४ ॥

न निश्चय कधीं ढळो, कुजन-विघ्न-बाधा-टळो ।
न चित्त भजनीं चळो, मति सदुक्त-मार्गीं वळो ।
स्वतत्त्व हृदया कळो, दुरभिमान सारा गळो ।
पुन्हा न मन हें मळो, दुरित आत्मबोधें जळो ॥ ५ ॥

दयामृतघना, अहो हरि ! वळा मयूराकडे;।
रडे शिशु, तयासि घे कळवळोनि माता कडे;।
असा अतिथि, धार्मिकस्तुतपदा ! कदा सांपडे ?
तुम्हां जड भवार्णवीं उतरितां न दासा पडे ॥ ६ ॥

## ७. भला जन्म हा : रामजोशी

भला जन्म हा तुला लाभला खुलास हृदयीं बुधा।
धरिसि तरि हरिचा सेवक सुधा ॥ ध्रु. ॥

चराचरीं गुरु तरावयाला नरा शिरावरि हरी।
जरा तरि समज धरीं अंतरीं।
हटातटानें पटा रंगवुनि जटा धरिशि कां शिरीं।
मठाची उठाठेव कां तरी।
वनांत अथवा जनांत हो कां मनांत व्हावे परी।
हरिचे नांव भवांबुधि तरी।
काय गळ्यांत घालुनि तुळशीची लाकडें
हीं काय भवाला दुर करितिल माकडें
बाहेर मिरविशी, आंत हरिशी वाकडें
अशा भक्तिच्या रसारहित तूं कसा म्हणविशी बुधा।
हरिरस सांडुन घेशी दुधा ॥ १ ॥

जाळ गळ्यामधिं माळ कशाला व्याळ काम कोपला।
आंतुनि, बाहेर म्हणविशी भला।
वित्त पाहतां पित्त येतसे चित्त पाहिजे मला।
असे हरि म्हणतो, नुमजे तुला।
दांभिक वर संभावित अभ्यंतरी नाहिंस बिंबला।
बहिर्मुख नर नरका लाधला ॥
तू पोटासाठी करि खटपट भलतिशी
परि भक्तिरसाविण हरि भेटेल काय तुशी
काय मौन धरुनियां गोमुखीला जाळिशी
स्वार्थसुखें परमार्थ बुडविला अनर्थ केला मुधा
न जाणसि कांजी म्हणसी सुधा ॥ २ ॥

## ८. घनःश्याम सुंदरा : होनाजी बाळा

घनःश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला।
उठिं लवकरि वनमाळी उदयाचळीं मित्र आला॥

सायंकाळीं एके मेळी द्विजगण अवघे वृक्षी।
अरुणोदय होतांचि उडाले चरावया पक्षी॥

अघमर्षणादि करुनि तापसी तपाचरण दक्षी।
प्रभातकाळीं उठुनि कापडी तीर्थपंथ लक्षी॥

करुनि सडासंमार्जन गोपी कुंभ घेऊनि कुक्षी।
यमुनाजळासि जाति मुकुंदा, दध्योदन भक्षी॥

मुक्तता होउं पाहे कमिळिणिपासुनि भ्रमरा।
पूर्व दिशे मुख धुतलें, होतसे नाश तिमिरा।
उठिं लवकरि गोविंदा सांवळ्या नंदकुमारा।
मुख प्रक्षालन करी अंगिकारी भाकर-काला॥ १॥

विद्यार्थी विद्याभ्यासास्तव सादर गुरुपायीं।
अध्यापन गुरु करिती, शिष्यहि अध्ययना उदयीं॥

याज्ञिकजन कुंडांत आहुती टाकितात पाही।
रविप्रभा पडुनिया उजळल्या शुद्ध दिशा दाही॥

हे माझे सांवळे पाडसे उठी कृष्णामाई।
सिद्धसवे बळिराम घेउनी गोधने वना जाई॥

मुनिजनमानसहंसा गोपीमनःकमलभृंगा।
सुरारपंकज पाणी पद्मनाभ श्रीरंगा।
शकटांतक सर्वेश हे हरि प्रतापतुंगा।
कोटिरवीहुनि तेज आगळे तुझिया वदनाला
होनाजी बाळा नित्य ध्यातसे हृदयिं नाममाळा ॥ २ ॥

## ९. निर्मिकाचे अखंड : महात्मा फुले

ग्रंथालय बा. क्र. ... स्थळ प्रत

निर्मिकानें जर एक पृथ्वी केली ॥ वाही भार भली ॥ सर्वत्रांचा ॥ १ ॥
तृण वृक्ष भार पाळी आम्हासाठी ॥ फळें तीं गोमटीं ॥ छायेसह ॥ २ ॥
सुखसोईसाठीं गरगर केले ॥ रात्रंदीन सारें ॥ तीच करी ॥ ३ ॥
मानवाचे धर्म नसावे अनेक ॥ निर्मीक तो एक ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

* * *

एक सूर्य सर्वां प्रकाशास देतो ॥ उद्योगा लावितो ॥ प्राणीमात्रा ॥ १ ॥
मानवासहीत प्राण्यांचे जीवन ॥ सर्वांचे पोषण ॥ तोच करी ॥ २ ॥
सर्वां सुख देई जनकाच्यापरी ॥ नच धरी दुरी ॥ कोणी एका ॥ ३ ॥
मानवाचा धर्म एक असावा ॥ सत्यानें वर्तावा ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

* * *

प्राणीमात्रा नेत्रें निर्मिकानें दिली ॥ पाहू तीं लागली ॥ एकमेकां ॥ १ ॥
ज्ञान सर्वां दिले सत्य शोधण्याला ॥ मार्गी लावण्याला ॥ अज्ञानास ॥ २ ॥
निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक ॥ भांडणे अनेक ॥ कशासाठी ॥ ३ ॥
मानवांनो तुम्ही ईशा नित्य भ्यावें ॥ सर्व सुखी व्हावे ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

* * *

स्त्रीपुरुषें सर्व कष्टकरी व्हावे ॥ कुटुंबा पोसावें ॥ आनंदाने ॥ १ ॥
नित्य मुलीमुलां शाळेत घालावे ॥ अन्नदान द्यावें ॥ विद्यार्थ्यांस ॥ २ ॥
सार्वभौम सत्य स्वतः आचरावें ॥ सुखें वागवावें ॥ पंगू लोकां ॥ ३ ॥
अशा वर्तनाने सर्वां सुख द्याल ॥ स्वतः सुखी व्हाल ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥

## १०. पर्जन्याप्रत : केशवसुत

ग्रीष्मानें तपली धरा करपली ही काय कीं, वाटतें;
चारा व्यर्थ गुरें पहा हुडकती; नेत्रीं धुळी दाटते;
छायेला जल तें असें जर कुठें, फेंसास त्या गाळित
त्या ठायीं जमती गुरें, पथिकही धापांस ते टाकित १

ऐशी होउनियां दशा दिवस ते झाले बहू पावसा!
ये आतां तर तूं त्वरा करुनियां लंकेवरूनी असा.
तुझ्या आगमनार्थ दर्दुरपती वापीतळापासुनी
रात्रीचे निजकंठशोष करिती हांका तुला मारुनी २

काकांहीं अपुलीं पहा घरकुलीं झाडांवरी डाळिली,
दाण्यानें घरटीं भरूनि चिमण्या यांहीं तशी टाकिलीं,
तूं येणार म्हणूनियां वळचणींखालीं गड्या! सम्प्रती
पाकोळ्याहि 'फड्क फड्क' करित या वस्तीस धुंडाळिती ३

रात्रीच्या दिवट्याच ज्या तव अशा खद्योतिका या पुढें
झाल्या दाखल; पावसा! विरमसी तूं सांग कोणीकडे?
रात्रीं त्या झुडुपामधीं फिरकती जेव्हां तयांच्या तती
उत्कंठा तुझियाविशीं असुचिया चित्तामध्यें प्रेरिती ४

भेटावयास तुला समुत्सुक अशा मुंग्या उडूं लागती;
पर्जन्या! तर ये! कृषीवल तुझ्या मार्गांप्रती ईक्षती;
झंझावाततयावरी बसुनियां, या पश्चिमाब्धीवरी
लाटा झोडित, गर्जना करित ये, बा मेघराजा, तरी! ५

## ११. मी : बालकवी

मी न जगाचा, मी न कुणाचा, मी नच माझा माझा;
परी पसारा सगळा माझ्या विश्वीं मत्प्रेमाचा. १

मी स्वच्छंदी, पुरता छंदी, धारी मी न कुणास;
परी मोहिनी विविधरूपिणी सृष्टीचा मी दास. २

मी येथें, मी तेथें, जगतीं जरी पूर्ण भरलों मी;
प्रशांततेसह परंतु माझा वास सदाचा व्योमीं. ३

मी शूरांचे शौर्य संगरीं, मी योग्यांचे ध्यान,
सृष्टीमध्यें स्वर्ग मीच, मी या विश्वाचा प्राण. ४

कल्पतरूंची फुलें तारका वेंचुन आणिन खालीं;
वाहिन मत्प्रिय वसुंधरेला नित्याची लाखोली. ५

जिथें न कांहीं तेथुनि आणिन मूर्ति व्यक्तित्वाला;
जादुगार मी, हवें तसें या वांकवीन जगताला. ६

अधर युवतिचा कोमल, त्याहुनि कोमल सुमनें फार;
मी पुष्पासम, नव्हे नव्हे हो, त्याहुनिही सुकुमार. ७

शून्याकारें, शून्याधारें, शून्यवृत्तिनें चालें.
परी हांसता मी या विश्वी वस्तुजात हे डोले. ८

## १२. एखाद्याचे नशीब : गोविंदाग्रज

काही गोड फुले सदा विहरती स्वर्गांगनाच्या शिरीं
काही ठेवितसे कुणी रसिकही स्वच्छंद हृन्मंदिरीं ॥
काही जाउनि बैसती प्रभुपदीं पापापदा वारि तें
एकादे फुटके नशीब म्हणुनी प्रेतास शृंगारिते ! ॥ १ ॥

कोणी पर्वत आपुल्या शिरिं धरी हैमप्रभा शीतला
कोणाच्या उदरामधून निघती मोठ्या नद्या निर्मला ॥
कोणाला वनदेवता वरितसे मोदात जी नाहते
एकाद्यामधुनी परंतु जळती ज्वालानदी वाहते ! ॥ २ ॥

झाडें जोडुनि पत्रयुग्म फुटले मेघाप्रती याचती
स्वच्छंदें जलबिंदु तोंच सगळ्या पानांवरी नाचती ॥
सारी पालवती, फुले विहरती, शोभा वरी लोळते
एकाद्यावर मात्र वीज पडुनी त्या जाळते पोळते ॥ ३ ॥

चाले खेळ असा जगात, बहुधा सौख्यात सारे जरी
एकादा पडतो तसाच चुकुनी दुःखार्णवीं यापरी ॥
पाही कोण अशा हताश हृदया ? जो तो असे आपला
देवा ! तू तरि टाकिं अश्रु वरुनी, त्यासाठी तो तापला ! ॥ ४ ॥

## १३. नकोस देऊ... : भा. रा. तांबे

( जाति : सृष्टिलता, राग भैरवी )

नकोस देऊ विरह मला गे सलणारा अंतरी ॥ ध्रु. ॥

नवी प्रीत ही नवलाखाची
तुझ्यासवे ग सुखवायाची
तूच मनाची राणी माझी
राज्य सुखाने करी १

फुलांत असतो भाव मधाचा
सुखसंभव गे तसा मनाचा
शृंगारातिल स्वप्नभूमिचा
तूच मार्ग अवतरीं २

कळा जिवाच्या कुणास सांगू ?
उबाळ मनीचे कसे आवरू ?
निरर्थ छायेमध्ये भटकू —
खरंच असा सुंदरी ! ३

दुःखापेक्षा मरण बरे गे
घेऊन जाते जीवन वेगे
सरेल येथुन नावहि अवघे
वियोग ना हा तरी ४

नकोस देऊ विरह मला गे सलणारा अंतरी !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
८०८६६ काव्य
2993 2.2.03

## १४. सुंदर हिरवे माळ ! : गिरीश

सुंदर हिरवे माळ ! चहुंकडे सुंदर हिरवे माळ !

जमली काळी वर घनमाला,
झिम् झिम् पाउस खालीं आला,
ग्रीष्मर्तूचा ताप निवाला,
कोंभ येउनी दूर दूरवर पालवले खडकाळे !

बोरवनाची सुकली पाने,
तरतरली या नवजलपाने,
विरळ बाभळी चैतन्याने
स्वानंदाने डुलू लागल्या सकाळ सायंकाळ

सुकली गवते गोठ्याखालुन –
हिरवळुनी बघती डोकावुन,
रसरसलेल्या तेजे न्हाउन –
मराठमोळा तरुण कुमारी लाजति की लडिवाळ

समोर इकडे तिकडे भवती,
हलू लागली हिरवी पाती,
ओलसरीने पाने दवती,
माळावरल्या वनराणीला नजराणाच सुढाळ

सुकल्या ओढ्यातुन ही खळखळ
मुरमाडातुन करी धावपळ,
गीत मोहिनी घालुन मंजुळ,
हळुच नर्तनी वाजवि अपुले पायांमधले चाळ !

जोगवलेली गुरे कुणाची
दूरवरूनी जात सांजची
अडवित तेजे मावळतीची ?
काळ्या छाया सरती एकामागुन एक विशाल.

क्षितिजी निळसर वाफाऱ्यांचे
तरंगती ढग नव रंगाचे;
शिखर न कोठे सह्याद्रीचे;
मात्र एकला जवळ उभा हा ऐटित राजमहाल !

निवली राने, गुरे वासरे;
निवली झाडे, रानपाखरे;
धनी अंतरी निवले सारे;
शेतकऱ्यांच्या पोटामधला निवेल कधी पण जाळ ?

## १५. सरितेचे चरित्र : यशवन्त

करिते का कधि खन्त
सरिता करिते का कधि खन्त ?

रांगत लोळत दौडत घोळत
कडेकपारीतुनी खळाळत
आक्रमिते निज पंथ ॥ सरिता० ॥

फुलो चान्दणे, असो ग्रीष्मदिन
असो तमिस्रा ढगाळ भीषण
समान शिशिर वसन्त ! ॥ सरिता० ॥

कुणी आणिली घागर मृण्मय
पखाल किंवा कलश हिरण्मय
पहावया न उसन्त ॥ सरिता० ॥

करोत मंजन रूप-यौवना,
दुर्जन, सज्जन, जरठ, अंगना
असो रंक धनवंत ! ॥ सरिता० ॥

करोत कोणी अस्थि-विसर्जन
ताबुत किंवा देव गजानन;
स्वागतशील उदंत ! ॥ सरिता० ॥

मरुभूमितुन दहनभूमितुन
गात चालली एकच गायन—
'करु जग शोभावंत !' ॥ सरिता० ॥

असे संतसम जीवित आखुन
आसमंत ही करीत पावन
वरिते सिंधु अनंत
सरिता विश्रुत-चरित दिगंत ॥ करिते का... ॥

## १६. अश्रू ! : साने गुरुजी

नको माझे अश्रू कधी नेऊ देवा
हाचि थोर ठेवा माझा एक

बाकी सारे नेई धन-सुख-मान
परी हे लोचन राखी ओले

माझे रूप मज अश्रू दावितात
हेचि तातमात प्राणदाते

अश्रू माझे थोर ज्ञानदाते गुरु
अश्रू कल्पतरू माझे खरे

अश्रूच्या बिंदूत माझा सुखसिंधु
नको तो गोविंदु कधी नेऊ

इवलासा अश्रू पर्वत बुडवी
जीवाला चढवी मोक्षपदीं

इवलासा अश्रू परी वज्रा चुरी
पाषाणाचे करी नवनीत

इवलासा अश्रू नको मानू तुच्छ
संसारी महोच्च स्थान त्याचे

इवलासा तारा दिसतो दुरून
परी तो मोजून कोण येई ?

बाळकृष्णाचे ते इवलेसे तोंड
यशोदा ब्रह्मांड देखे त्यात

इवलीशी मूर्ति बटु वामनाची
परी त्रैलोक्याची केली मिती

इवलेसे पान रुक्मिणी ठेवीत
लीलेने तुळीत विश्वंभरा

इवलासा अश्रू तसा माझा आहे
सारे त्यात राहे भाग्य माझे

अश्रू माझी आशा अश्रू माझे बळ
अश्रू हा निर्मळ जवळ असो !

## १७. जात्यावरलं गाणं : ग. ल. ठोकळ

झुंजूमुंजू झालं, सुकदेव वर आला
पहाटचं वारं कसं झोंबतं अंगाला

परसांत माझ्या आरवतंय कोंबडं
लई वक्त झाला, आता फुटलं तांबडं

केधुळं वढत्ये बाई जातं घरघर
पारुसं ग काम माझं पळंड घरभर

देवळीत जळे पणती ग मिणमिण
भळभळ गळे पीठ कसं जात्यांतून;

अवंदाचं साल, न्हाई आलं पीकपाणी
दूरदेशी गेला बाई माझा घरधनी

दूरदेशी गेला मला एकली टाकून
तिठं न्हाई त्येला जीव लावायला कोन

राया डोळयामंदी तुझ्या मोतीयाचं पाणी
राया तुझा रंग जवसाच्या फुलावाणी

तुझ्या डोईवर अक्षी पागूटं कुसंबी
तुझं वठ बाई जशी फुलली दाळिंबी

राया तुझं दात जसं धुतलं तांदूळ
तुझ्यासाठी मला जनूं भरंलया खूळ

तुझ्याबिगर रे ! मला घासही जाईना
तुझ्याबिगर रे ! मला पाणीही घोटे

तुला आवडतो हुळा भुजून ठीवला
कसं करू बाई ? सम्दा वाळून चालला

कवाशिक याल माझ्या कुडीतल्या जीवा ?
कवाशिक याल माझ्या देवाच्या बी देवा !

## १८. मन : बहिणाबाई चौधरी

मन वढाय वढाय
    उभ्या पीकांतलं ढोर
किती हाकला हाकला
    फिरी येतं पीकावर

मन मोकाट मोकाट
    त्याले ठायी ठायी वाटा
जशा वाऱ्यानं चालल्या
    पाऱ्यावऱ्हल्या रे लाटा

मन लहरी लहरी
    त्याले हाती धरे कोण ?
उंडारलं उंडारलं
    जसं वारा वाहादन

मन जहरी जहरी
    याचं न्यारं रे तंतर
आरे इचू , साप बरा
    त्याले उतारे मंतर !

मन पाखरू पाखरू
    त्याची काय सांगू मात ?
आता व्हतं भुईवर
    गेलं गेलं आभायात

मन चप्पय चप्पय
त्याले नाही जरा धीर
तठे व्हयीसनी ईज
आलं आलं धर्तीवर

मन एवढं एवढं
जसा खाकसाचा दाना
मन केवढं केवढं
त्यात आभाया मायेना

देवा, कसं देलं मन
आसं नही दुनियात !
आसा कसा रे यवगी
काय तुझी करामत !

देवा, आसं कसं मन ?
आसं कसं रे घडलं
कुठे जागेपनी तूले
आसं सपन पडलं.

## १९. आत्मबल : वि. दा. सावरकर

अनादि मी, अनंत मी, अवध्य मी भला
मारिल रिपु जगतिं असा कवण जन्मला ॥ ध्रु. ॥

अट्टहास करित जइं धर्मधारणीं
मृत्युशीच गाठ घालु मी घुसे रणीं
अग्नि जाळि मजसी ना खड्ग छेदितो
भिउनि मला भ्याड मृत्यु पळत सूटतो
खुळाऽ रिपूऽ । तया स्वये
मृत्युच्याचि भीतीने भिववु मजसि ये ...१.

लोटि हिंस्र सिंहाच्या पंजरी मला
नम्र दाससम चाटिल तो पदांगुला
कल्लोळी ज्वालांच्या फेकिशी जरी
हटुनि भवति रचिल शीत सुप्रभावती
आणि तुझ्या तोफांना क्रूर सैन्य ते
यंत्र तंत्र शस्त्र अस्त्र आग ओकते
हलाऽ हलाऽ । त्रिनेत्र तो
मी तुम्हासि तैसाची गिळुनि जिरवितो...२.

## २०. तहान : अनिल

जिवाला लागते तहान जेव्हा
पिऊन घेतो अनंत ताऱ्यांनी थरारलेली तरल हवा
सुखदु:खांचे ऊन थंड श्वास
आशा–निराशांच्या अंतरंगातील अदम्य विश्वास
मिसळून आर्द्र झालेली हवा

जिवाला लागते तहान जेव्हा
पिऊन घेतो आकाश-धरेच्या भास्वररंगांचा स्निग्ध ओलावा
अवसेच्या काळ्या डोळ्यांतील पाणी
पुनवेच्या अंगी रजतरंगाचे हिमसेक, आणि
विनाकिनाऱ्याच्या सागरावरचे निळे तुषार
गवतावरल्या लसलसत्या हिरव्यागार
रंगामधल्या दवबिंदूचा स्निग्ध ओलावा

जिवाला लागते तहान जेव्हा
पिऊन घेतो जिवलगांच्या सहवासातील तृप्त विसावा
स्तन्य ओसंडिता बाळाच्या ओठी
जड पापण्यात झाकळता दिठी
प्रिया-प्रियकर-समीलनाची सैल पडता मिठी
आकंठ पूर्तीचा दिसे जो विश्रब्ध तृप्त विसावा

जिवाला लागते तहान जेव्हा
पिऊन घेतो वासात भिजल्या आठवणींचा ओला गारवा
मातीच्या उन्मत्त गंधात न्हालेली प्रथम भेट
सागाच्या फुलांत चिंब झालेली स्निध ताटातूट
प्राजक्तांच्या हारी झिमझिम सरी पुनर्मीलन

मोगऱ्याचा वास चिर-सहवास
दुरावता आणि दुरदुरून
पिकल्या धानाच्या सूक्ष्म सुवासाच्या आठवणींचा ओला गारवा

जिवाला लागते तहान जेव्हा
पिऊन घेतो स्मृतींच्या तंद्रीत मंद्र संगीताचा धुंद गोडवा
वेळुवनातील नाजुक शीळ, पतझडीची आर्त सळसळ
सागराचे घनगंभीर गर्जित, अस्ताचे मंद खर्जातील सूर
सनईसारख्या कोवळ्या गळ्याची तीव्र हुरहूर
कपालाकाशात शान्त घंटानाद
निर्याण-गीताच्या शिंगाची साद
महाप्रस्थानाच्या प्रलयलयीच्या मंद्र संगीताचा धुंद गोडवा.

## २१. प्रीतीसाठी प्रीती : कुसुमाग्रज

प्रीतीसाठीच प्रीतिघोष घुमतो, प्रीती चिरंजीविनी
आहे तीत उदात्तता म्हणत ते ती ईश्वरी भावन

वीणा छेडित गात संतत तिचे दिव्यत्व वागीश्वरी
होतो मुग्धच मी, परंतु मज ती थोरीव ना जाणवे

माझ्या प्रीतित दिव्यता न असली, ती मानवी सर्वथा
आहे ती तुझियावरी नि रमते ती वर्तमानामधे

कोठे शाश्वत या अशाश्वत जगी, ज्या अंतरी ही उदे
तेही नश्वर, वाहते अनुदिनी शून्याकडे जीवन !

विश्वाचीहि फुले गळून पडती आकाशगंगेमधे
प्रीतीलाच कसा चिरंतनपणा जी जन्मली नश्वरी ?

आहे एकचि सत्य, तेहि तुजला व्हावे दिलासा न का ?
चाले जो क्षण त्यावरी विहरते गे नामसुद्रा तुझी !

जाणाऱ्या घटकेत जीवित भरे, अज्ञात आहे उद्या
व्हावे दुःखित का तिची प्रणयिनी, मांडूनिया कुंडली ?

## २२. झाडं पानात येतात : पु. शि. रेगे

झाडं पानात येतात
तेव्हा आकाशाच्या खिडक्या मिटायला सुरवात होते

नंतर
पुढं जेव्हा ती चांदणी पानं एकामागून एक
गळू लागतात
तेव्हा त्यांच्याकडे फार बघायचं नसतं
समजायचं असतं ती नाहीच

कारण
अचानक जेव्हा वाऱ्याची बहादर उठावणी होते
तेव्हा त्यांचे आधीचे कसलेले रंग
एकासारखे एक झालेले असतात.
ती कुठल्याही झाडाची असतात
कुठल्याही मातीवर उतरतात.

म्हणून
आकाशाला जडावाचं छत असतं
आपल्याला पुन्हा छबेली जमीन.

## २३. हिरवळ आणिक पाणी : बा. भ. बोरकर

हिरवळ आणिक पाणी
तेथे स्फुरती मजला गाणी
निळीतुनी पाखरे पांढरी किलबिलतात थव्यांनी

सुखात चरती गुरेवासरे
लवेतुनी लहरते कापरे
हवेतुनी आरोग्य खेळते गार नि आरसपानी

उरी जिथे भूमीची माया
उन्हात घाली हिरवी छाया
सांडित कोमल आनंदाचे पाझर पानोपानी

जिथे अशी समृद्ध धरित्री
घुमति घरे अन् पुत्रकलत्री
रमे श्रमश्री माहेरींच्या स्वाभाविक लावण्यी

सख्यापरते जिथे न बंधन
स्मितात शरदाचे आमंत्रण
सहजोद्गारी गाढ चांदणे, स्पर्शी स्नेह हिमानी

ऋतूऋतूतुन जिथे सोहळे
तसेच उघड्यावरी मोकळे
आणि अंगगी शृंगाराची निर्मळ अमृतवाणी

देव जिथे हृदयात सदाचा
भार मनाला नसे उद्याचा
सुखे दुज्याच्या हिरवळ चित्ती, दुःखे डोळां पाणी.

## २४. बाभूळ : ग. ह. पाटील

( जाती : लीलारती )

हे सुवासिनी, शालीन ग्रामकन्यके
मी प्रसन्नमनसा तुज बघतो कौतुके
तव अंग हळदिचे, हिरव्या वसनान्तरी
तू दिसशी मज लाजरी नवी नोवरी

भोवती तुझ्या निज वैभवात रंगले
आहेत उभे धनिकांचे नव बंगले
तव साधेभोळे मराठमोळेपण,
शहरात कुणाला पण हे आकर्षण !

' ही दिसे खेडवळ कोण इथे पाहुणी ! '
तरु शहरातिल तव करिती हेटाळणी
या बोगनवेली कशा कुंपणातूनी
तोऱ्यात तुजकडे बघती डोकावुनी !

हा गुल्मोहर, शिरि लालभडक मन्दिल
पण नजर तयाची नाही गे निर्मळ !
या ' चटक चांदण्या ' तुज छळिती चंचला
तू उभी त्यामध्ये सावरुनी अंचला

निज करड्यांसह शेरड्या तुला बिलगती
मज होते तेव्हा शकुंतलेची स्मृती !
कधि बसती भांडत भांडखोर भोरड्या
मैत्रिणी काय या लग्नातिल करवल्या !

माहेर तुझे तो खेड्यामधला मळा
तू चुकून आलिस शहरातिल या स्थळा
विहिरीचे पाणी, पाटातुन झुळझुळा–
वाहते, तिथे तू शोभतीस मंजुळा !

आहेस उभी तू जिथे, सांगतो तुला
श्रीमंत कुणी बांधणार गे बंगला
तव दर्शन तेव्हा असेच होईल का ?
मी काय कथू ? तो काळ असे बोलका !

## २५. श्रावण येतो आहे : ग. दि. माडगूळकर

फुलव पिसारा मोरा, श्रावण येतो आहे !
उंच स्वराने वारा 'स्वागत' गातो आहे !

तू धरणीचा मानसभाव
सहजनृत्य हा तुझा स्वभाव
आजवरीच्या उच्छ्वासांचा सौरभ होतो आहे !

सरे प्रतीक्षा, आर्जवगीत
गगनामधुनि येते प्रीत
ही प्रीतीची दौलत राजा मन्मथ देतो आहे !

थेंब कशाचे ?– जलवर्षाव
तृप्तीमाजी बुडेल गाव
वसुंधरेचा प्रियकर वेगे दौडत येतो आहे !

लवते वेली, हलते झाड
विजयाआधी धुंद पवाड
संघनृत्यि या उडते माती, गुलाल होतो आहे !

## २६. मी न माझा राहिलो ! : मनमोहन

या नदीला घाट छोटा
बांधुनी मी चाललो

जन्मली वेदासवे जी
सिंधु ही सारस्वताची
दे स्मृती आता श्रुतींची
व्यास आणि वाल्मिकींची
मी इच्या पाण्यात रसिका !
थेंब म्हणुनी खेळलो

मी नव्हे शिल्पज्ञ मोठा
तंत्र नव्हते माहिती
चार धोंडे जोडणारी
ही किनाऱ्याचीच माती
फक्त तीचा चिखल व्हाया,
अंतरी मी ओळलो

या प्रवाहाच्या गतीला
पृथ्वि गाते आरती
जी त्रिकालज्ञास ठेवी
आपुल्या विस्तीर्ण पोटी
लाज बांधो बांधणारा
मी वडारी जाहलो.

गर्व कुठला, गर्जनाही
या निवान्तातून जाई
ईश्वरी कंठातली का
जाइ कोमेजून जाई ?
लोटताना देह डोही,
मी न माझा राहिलो ... !

## २७. दुवा : शांता ज. शेळके

प्रत्येक सुकलेल्या पाकळीत
अंतर्भूत असते सुगंधाची गाथा
उमलण्याची व्यथा
    वाऱ्यावर लिहिले गेलेले उच्छ्वास
    खोल कोठे क्वचित फळाची आस
उन्हाशी केलेले सोनेरी संकेत
डोलताना मजेत;
    त्याच्याही मागे वेदना निरुपाय
    रुजलेला कोठे फूलपाखराचा पाय
    काट्याची सल, पाण्याची ओल;
प्रत्येक सुकलेल्या पाकळीत
असतात दडलेले अनंत संभव
    अधिक उणे
    स्थलकालाचा दुवा जोडणारे सलगपणे

    जसा प्रत्येक शब्द उमटलेला, न उमटलेला
    अथवा जन्मताना विझलेला ओठी
    ज्याच्या पुढे आणि पाठी
    उभे असते एकेक विश्व.

## २८. एका पावसाळ्यात : शिरीष पै

एका पावसाळ्यात लिहिलेली ही असंख्य प्रेमपत्रे
प्रीतीच्या वर्षावात भिजलेले अनंत आर्द्र शब्द
ही न संपणारी आश्वासने ... कोसळताना दिलेला धीर
पावसात चिंब नाहलेली ही विरहाची दीर्घ रात्र
हा दुरावा आकाशभर पसरलेल्या काळ्या मेघासारखा
ओल्या काळोखातून परस्परांना दिलेली ही आर्त हाक
अथांग भिजलेल्या मातीप्रमाणे ही थकलेली गात्रे
थंडगार वाऱ्यासारखी वहात आलेली ही व्याकुळ आठवण
दूर दूर असल्याने जाणवणारा हा मीलनाचा गंध
अन् हळूहळू झिरपणारी ही आसक्तीची तीव्र धार...

## २९. मानवांनो, आत या रे : विंदा करंदीकर

पर्वतांनो, दूर व्हा रे ! सागरांनो, दूर व्हा रे !
उघडिले मी दार माझे; मानवांनो, आत या रे.

वादळाची काय भीती ?
तीच माझे गीत गाती.
वादळांना जन्म देती श्वास माझे पेटणारे.

भूक माझी वाढलेली;
प्राण माझा वाढलेला;
वाढलेले पंख माझे या नभी ना मावणारे.

कालसर्पाला अता मी
जिंकिले जाऊन व्योमी !
वीज ही रे चोच माझी, मेघ हे माझी पिसे रे

आज माझा देह साधी
विश्वऐक्याची समाधी;
कोंडले जातील आता मानवा या कोंडणारे.

दुर्बलांना, दुःखितांना,
शापितांना, शोषितांना,
आज क्षितिजाच्या करांनी देत मी आलिंगना रे.

## ३०. ही निळी पांढरी : इंदिरा संत

ही निळी पांढरी शरदातील दुपार :
तापल्या दुधापरि ऊन हिचे हळुवार;
दाटली साय की स्निग्ध शुभ्र आकाशी
फिरतात तशा या शुभ्र ढगांच्या राशी.

त्या ऊन दुधाचे घुटके घेत खुशाल
सुस्तीत लोळतो खाली हिरवा माळ;
अन् बसल्या तेथे गाई करित रवंथ
वारीत शेपट्या, कोणी चरती संथ.

साचल्या तळ्याचे पाणी लाल गढूळ;
उमटले त्यामध्ये दुपारचे आभाळ.
ती झाडी उलटी; धुंद हलेना पान;
नजिकच्या पुलाची उलटी भव्य कमान.

लावून समाधी बसल्या त्याच तळ्यात
जलविहार करण्या म्हशी किती धुंदीत
कुणि परीट तेथे काळ्या दगडावरती
धूतसे शब्द तो धुंद कोंडला भवती

दोरीवर हाले कपड्यांची ती ओळ.
तरळते संथ ती बगळयांची का माळ ?
जवळीच लोळती कुणी गुराखी पोरे,
कुणि पतंग सोडुन खेचित होती दोरे,

का अशी विलक्षण इथे पसरली धुंदी ?
का प्रसन्नता ही सुंदपणे आनंदी ?
का गोड जाड्य हे पसरे धरणीवरती ?
रेंगाळत का हे सौख्य विलक्षण भवती ?

दिस भरलेली ही काय तरी गर्भार
टाकीत पावले चाले रम्य दुपार !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत

## ३१. चिरवसन्ताचे वैभव : बाबा आमटे

जीवनातला चिरवसन्त पाहण्यासाठी
माणसाला स्वतःचीच पटवावी लागते खात्री
मुलामध्ये पाहावे लागते पालवीचे प्रतिबिंब
प्रत्येक दुःखावर धैर्याचा उतारा असतो
( करेज इज क्युअर फॉर एव्हरी सॉरो )
त्या उताऱ्याला पथ्य हवे असते
मुलायम करुणेचे
प्रेमळ सहानुभूतीचे
ज्या नजरेत ती तरळते
त्यांना भकास रडक्या डोळ्यांत,
काळजीची कावीळ उठलेल्या चेहऱ्यावरही
दिसतात सौंदर्यांच्या रेषा
कारण त्यांचा माणसावरचा, माणुसकीवरचा
विश्वास अदम्य असतो,
परमेश्वरावर तेच विश्वासू शकतात.
प्रेमाची असोशी राखण्यापेक्षा प्रेमाची पाखर घालणे,
घेत्याची भूमिका न घेता दाता होणे,
सेवेचा स्वीकार करण्याऐवजी सेवक होणे
–हे त्यांच्या जीवनाचे सूत्र असते.
त्याला अनुबंध जोडणारे काही चिरंतन असलेच तर
ती आहे अमर्याद शक्ती–
दुसऱ्याला मदत करण्याची
–इन्फिनेट स्ट्रेंग्थ टु हेल्प ! !
सुताराच्या त्या मुलात
गुरे चारणाऱ्या त्या गुराख्यात

आणि प्रत्येक अश्रूचे निर्व्याज हास्यात
रूपान्तर करणाऱ्या
त्या एकाक्या निघालेल्या शिखरात
ही शक्ती असते.
अशा मनांना ध्यास जडतो
माणसातले सत् फुलवण्याचा
जनमानसात त्यांचे आचार-जीवन
ताऱ्यांसारखे चिरकाल चमकत राहते
ते प्रेषित असतात....
दुःखाची धार ते बोथट करतात
विषदंश करण्यापूर्वीच संशयाची नांगी ठेचतात
भीतीची सावली पडण्याआधी
विजनातून फुटते शलाका !
पानाने डवरलेल्या वृक्षाचा
आविष्कार होत असतो
इवल्याशा बीजातून.
लहानशी अंकुरलेली प्रवृत्ती
वर्षानुवर्षे नवनवा आकार घेत
अवकाश व्यापत असते
काही पाने गळून जातात
पानझडीनंतर नवा धुमारा फुटतो
डहाळ्यांवर अधिकाधिक पक्षी जमू लागतात
नवी स्नेहाळ घरटी बांधू लागतात
प्रत्येक ऋतुचक्रावर बहरतो त्याचा साज
फुले-फळे खुणावता खुणावता
होऊन जातात स्नेहमय
आणि आपली मुळे रोवून एकाच जागी
तो वृक्ष पाहात असतो
वैभव- चिरवसंताचे

## ३२. बरेच दिवस : मंगेश पाडगावकर

बरेच दिवस
कुणासाठीच झुरलो नाही
बरेच दिवस
हुरहुरून फिरलो नाही

बरेच दिवस
खदखदून हसलो नाही
दूरच्या ढगात
डोळे लावून बसलो नाही

बरेच दिवस
रोजची वाट चुकली नाही
बरेच दिवस
मनात वीज झुकली नाही

बरेच दिवस
रस्त्यावरती थांबलो नाही
विसर पडून
तासन् तास बोललो नाही

बरेच दिवस
शीळ घालीत हिंडलो नाही
बरेच दिवस
माझ्यात मीच बुडलो नाही

बरेच दिवस
कैफ चढून रंगलो नाही
बरेच दिवस
जगूनसुद्धा जगलो नाही.

## ३३. श्रावण : सरिता पदकी

हा न बेभान श्रावण
धुंद आवेगावाचून
विसावता भारावून
धुंदकारली धरणी
– असेच ना तू वेडता
मिटे नयनपाकळी

ही तो तुझी-माझी प्रीत
जिला दुजे न माहित
याच्या श्यामल मिठीत
हासू ओलावे दिठीत
मज मालवते सारे
काही पालवे गहिरे

क्षण तरल तुषारी
दाट वनीच्या झऱ्याचे
– असेच ना काहीसे तू
उलगडे कैफ ज्याचा

दूर पटल सरावे
स्मित अस्फुट झरावे
बोलतोस निःश्वासून
शब्दा-अर्थांहिवाचून !

असा बघता बघता
तीरापरी शिरावाच
आणि आठवती मला
कंठाखाली टेकलेले

गर्द राईच्या उरात
भाट सृष्टीचा उन्मत्त,
असे सहज वेगात
तुझे आसुसले ओठ

– छेः, न श्रावण बेभान
मत्त राधिका मनीची

भानहीन मीच खुळी
तुझ्या रंगी हरपली !

## ३४. महाराष्ट्र उन्मेषशाली : प्रफुल्ल दत्त

महाराष्ट्र हा, स्वामिकार्यार्थ येथे
उभी राहिली संघशक्ती सदा
इथे खड्ग–भाल्यावरी शौर्य नाचे
दुभंगावया उद्धतांच्या गदा

मराठा वरी राजनीती शिवाची
पदी नम्र होतो समर्थांचिया
गुणांची जिथे होतसे बूज तेथे
प्रसंगी धजे प्राण अर्पावया

तुका एकतारीत ध्यानस्थ होता
व्यथा बोलती हो अभंगातुनी
चढे लोचनी नीर इंद्रायणीचे
भ्रमे नाव निवृत्तिच्या रंगणी

इथे पैंजणाची नशा पौरुषाला
भिजे रात्र इष्कात येथे जरी
तरी राउळी कीर्तनी श्रीहरीच्या
खरी रंगते भाबडी वैखरी

तशी येथली मृत्तिका ही विरागी
जटा, छे! तपस्या शिरी धारिते
कधी रौद्ररूपे दिगंतास वेढी
कधी पाप गंगेपरी वारिते

इथे अर्चना होइ विद्याधराची
इथे भेटतो अर्जुनाला हरी
मिळे येथ चौरंग गीतेस त्याच्या
गुरुत्वा इथे मान ब्रह्मयापरी

इथे याचिता याचितो ओंजळीने
प्रपातातुनी दान हाती पडे
तपःपूत जो दंडकारण्य लंघी
तयाचेच ओलावते आतडे

असा हा महाराष्ट्र उन्मेषशाली
इथे भाव-पंचामृताचे घडे
उभा ठाकता स्वत्व संरक्षणाला
झडे झुंज, वैरी दिगंती दडे !

## ३५. माहेर : यशवन्त भिमाले

आज अचानक येता
आठवण माहेराची
घाई माझ्या नयनात
झाली भोळ्या आसवांची !

आठवते माझी आई
आणि तिची वेडी माया
चंदनाने माझ्यासाठी
किती झिजविली काया !

आठवती माझे बाबा
त्यांचे विशाल ललाट
आणि शब्दांच्या लाटेत
वाहे माया काठोकाठ !

आणि आठवते ताई
हळुवार जपणारी
ओल्या ओल्या आसवांनी
जखमांना क्षाळणारी !

अशा माहेराला माझ्या
लक्ष चांदण्यांची शान
वाटे फिकी ज्याच्यापुढे
इन्द्रधनूची कमान !

## ३६. मेघ माझ्या अंतरीचे : गोपाळ किराणे

मेघ माझ्या अंतरीचे पिळवटोनी हासले
जीवनाचे ओघ सारे सागरा मी अर्पिले ॥ ध्रु. ॥

शांत हे काहूर झाले, शांत झाली वादळे
मानसीचे गीत गाता भान माझे हरपले
काम माया मोह सारे शंकराने जाळले
अंतरीच्या देवतांना मंत्रुनी आमंत्रिले ॥ १ ॥

वज्रशक्ती अंगि येता गजबलाची मनगटे
दिव्य दृष्टी लाभ होता योजनाते लंघिले.
विश्व सारे व्यापणारी वामनाची पाउले
प्रेमपाणी लाभलेला अर्जुनाचा तीर चाले ॥ २ ॥

दुःख माझ्या अंतरीचे आंधळे वेडे पळाले
द्वेष रागाची, भयाची फाटली काळी निशाणे
देह माझा लोभ त्याचा मीपणाचे गान गेले
अंतरीचे कमल माझे सौरभाने विकसलेले ॥ ३ ॥

तप्त लाव्हा मेदिनीला लाख पट्टे रेखु दे
हिमगिरीचे तीव्र पाते सागराते भंगु दे
या विजांचे लाख भाले नेत्र दैवे रोखले
ही धरा विछिन्न पावो, ध्यान ध्रुव ना डळमळे ॥ ४ ॥

फत्तरांनी फोडिले वा बाण भाले टोचले
तस्करांनी वेढिले अन् भास्कराने पोळिले
मुक्त आत्मा भंगला ना कोटि तेजे पाजळे
मी यशाच्या धवल गगनी लाख झेंडे रोविले ॥ ५ ॥

## ३७. माझ्या स्वप्नीं : वसंत बापट

माझ्या स्वप्नीं दिसते मजला
सस्यश्यामल रम्य धरित्री
सदाकदा भरती दरियाला
सदाकदा पुनवेच्या रात्री

माझ्या स्वप्नीं... वनीं उपवनीं
बारा महिने वसन्त फुलतो
प्राजक्ताच्या पायघड्यांवर
मदन सदा हळुवार चालतो !

माझ्या स्वप्नीं... शान्त सरोवर
नौका वीणा अन् मृगनैना
तारे... वारे इंद्रधनुष्ये
आकाशीं हरिणाचा ऐना

स्वप्नातुनि परि जागृति येता
विस्कटलेली भग्न धरित्री
गढूळ जीवन घामट कोमट
भर दिवसा अंधेऱ्या रात्री !

रणरण वणवण, घणघण घंटा...
कोलाहल... कलहाचा वारा
क्षुधा, तृषा, अपुऱ्याच वासना
फुलात विष अन् जळीं निखारा !

प्रजापतीपरि इच्छा होते
कीं मत्स्वप्न असे पसरो की
विकट सत्य हे अदृश्य होउन
स्वप्नचि फक्त उरू दे बाकी !

## ३८. दोन कविता : मधुकर केचे

१.

टाळ मृदंगीं रंगत
राहो तुक्याचा अभंग
गोड आतूर हाकेचा
नको दर्शनाने भंग

माझी ओढ चिरंतन
नको मुक्तीचे बंधन
अशी अशीच रहावी
माझी शाश्वत तहान

तुझ्या शोधात आनंद
नको सराया ही वाट
बरे झाले पुंडलिका !
मागे भिर्कावली वीट.

* * *

२.

एका नव्या जाणिवेत
माझें मृदंगले मन
देह सतारीची तार
आणि पायच पैंजण

नव्या चाहुलींत रंगे
नव्या जाणिवेचा नाच
अनाहूत झंकारांनी
निनादला रंगमंच.

* * *

## ३९. पाखरांचे गीत : जवाहर मुथा

जगातल्या प्रत्येक स्थळी
आपण आता भेटतो आणि विलग होतो...
अंजलीत स्वप्नांना घेऊन
माझं प्रेम आज घरी परतलं आहे,
पाखरांचे गीत
माझ्या हृदयाला नवीन वळण देत आहे
तुला कळत नाहीत
माझे विमल शब्द ?
माझा दुष्काळ ? आणि माझे युद्ध ?
मी वळतो आणि
थंडगार आंधळ्या हातांनी रस्ता
शोधतो, तेव्हा
सूर्य आकाशाच्या दरवाजाला
धक्का देतो–
तुला अजून कसं कळत नाही
तो सूर्य मी
व आकाशाचा दरवाजा तू आहेस म्हणून !

जगातल्या प्रत्येक स्थळी
आपण आता भेटतो आणि
विलग होतो.

## ४०. आता मजेने बोलतो : सुरेश भट

आता मजेने बोलतो भेटेल त्या दुःखासवे !
सांभाळुनी घेती मला माझी इमानी आसवे !

प्रत्येक वेळा मी मला माझी खुशाली सांगतो
प्रत्येक वेळी आणतो ओठावरी हासू नवे !

सैराट तेव्हा हिंडला माझाच टाहो पोरका
आता इथे जे सोसतो ते आसऱ्यासाठी हवे !

माझा जगायाचा गुन्हा माझ्याच संगे संपला
जो संपलो मी एकदा त्याला न आता शोधवे !

माझ्या चितेला चूड मी लावून झालो मोकळा
आता कशाला मी करू ज्या त्या बघ्यांची आर्जवे !

आता अनुज्ञेवाचुनी गातात ही गीते मला
माझा स्वतःचा सूरही आता न ओठी पालवे !

केव्हा तरी दात्यापरी आयुष्य हाका मारिते
मीही असा भिक्षेकरी ज्याला न काही मागवे !

## ४१. माझे शब्द : नारायण सुर्वे

माझे शब्द तुम्हांला आमची कथा सांगतील
याच सोहळ्यासाठीं दोन अश्रू जपून ठेवलेत.

मिरवीत याल खांद्यावर महाद्वारांतून
केव्हाचे गळयाखाली घोष लपवून ठेवलेत.

विचाराल कुठे आहे तो पहाट शोधणारा
म्हणून गीतात ओळखीचे सूर ठेवलेत.

फुलारेल माझी कविता, वेडावेल, नाचेल,
तिलाही जीवनाचे अर्थ शिकवून ठेवलेत.

खळयातून, मळ्यातून, ताऱ्यावाऱ्यातून याल
कुठूनही यावे; रस्ते मोकळेच ठेवलेत.

शांत दिसले जरी शहर, गाव, माझा देश,
मुठी वळलेले हात घराघरात ठेवलेत !

## ४२. दर्शनबधिरा : पद्मा गोळे

तू यायचास म्हणुनी
सदनि लाविते स्वप्नांचे झुळझुळते पडदे
रेखुनि त्यावर चित्रे
हिमालयाची, कुजबुजत्या सागर लाटांची.
घड्याळासही बजाविते की
नको वाजवू पाऊल टकटक, थांब जरासा.
गुंफित गंधित पुष्पे स्मरणांची मौनांची.
आणिक येता चंद्र दिव्यामधि
विरल शुभ्र घन असा पसरिते हळू तयावर
फक्त दिसावा तुझा चेहरा;
अन् मी होते संध्या मिलनअधिरा :
करात घेऊन गुच्छ जुईचा दिसेनसेसा
मीलनअधिरा.

तू येउन गेल्यावर
विरतो पडदे
फरफटते कालाचे पाउल,
चंद्र दिव्यातून जातो निसटून;
उरते फक्त निळे तम भवती,
अनाघ्रात तो गुच्छ जुईचा
अन् मी दर्शनबधिरा—
केवळ दर्शनबधिरा

## ४३. निरोप : विद्या परचुरे

कन्या असुची, कन्या तुमची
असो कुणाची जरी—
जायची अशीच अपुल्या घरी ॥ ध्रु. ॥

लालन-पालन पोषण केले
रीतिभातिचे वळण लाविले
मायेची जरि पाखर घाली माउलि वरचेवरी
जायची तरिही अपुल्या घरी ॥

थोर पित्याने शिक्षण दिधले
सुसंस्कृतीचे ब्रीद शिकविले
पुण्य मिळवुनी कन्यादानी धन्य पिता हा जरी
जायची तरिही अपुल्या घरी ॥

नात लाडकी पितामहांची
सुगृहिणी तू शोभसि साची
निरोप देती आज तुला हे राहि सदा हासरी
जेधवा जाशिल अपुल्या घरी ॥

सौभाग्याची लेणीं लेवुनि
उभयकुलांचे नाव भूषवुनि
पतिधर्मव्रत सार्थ करूनी, पतिसेवा आचरी
जेधवा जाशिल अपुल्या घरी ॥

मानुनि घ्यावे बोल गोड हे
उणे अधिक ते क्षम्य असावे
पदरी घ्यावी कन्या म्हणुनी, स्नुषा जरी आपुली
आजही येइ अपुल्या घरी ॥

## ४४. सरितेचे विरह-गीत : दत्तप्रसन्न कारखानीस

तुझ्या सौभाग्य-सौहार्दे सख्या ! लोभावुनी गेले
नको रे, सागरा लोटू तुला भेटायला आले ॥ ध्रु. ॥

दरिद्री अद्रि-कन्या मी न ठावे नागरी चाळे
मनाचे गुंतले धागे तिथे वेडीपिशी झाले !

पहाडी, शांगडी माझे पिताजी अन्तरी भोळे
उरि-स्कन्धी तयांच्या मी मुदे रात्रंदिनी खेळे !

तुझ्या हिम-शुभ्रफेनाची कटी मम मेखला शोभे
शुभांगी, वीचि-मालांचे उभी ल्यायास मी शेले !

प्रमाथी वृक्ष-राजींनी सभोती घातले फेरे
लतांनी गावुनी गाणी फुलांचे वाहिले झेले !

मिजासी मेघराजाचे मधी हुंकारणे चाले
खुळ्या ओढाळ ओढ्याची तशी कुजबूज घोटाळे !

कुणाची मानली पर्वा न, कोणाला जुमानीले
दरी खोरी वलांडूनी तुझ्या भेटीस मी आले !

—पुरे ही वंचना आता कशाला हाल-हिंदोळे ?
नको रे सागरा, लोटू तुला भेटायला आले !

## ४५. बाई लाजऱ्या उषेची ! : विजय सुराणा

निळ्या आकाश मातीला
जाळितसे सूर्य-ऊन
वरुणाच्या वर्षावात
माती निघते न्हाऊन !

आकाशाच्या मातीमध्ये
वाहे आकाशाची गंगा
पाट काढून दिधले—
पाणी साऱ्या अंगाअंगा !

रजनीच्या महिन्यात
होते पेरणी बियांची
इथे चंद्र शेतकरी
पेरी ज्वारी चांदण्याची

मध्यरात्रीच्या मासात
पिके फोफतात सारी
हाती घेऊनी गोफण
ध्रुव करतो चाकरी !

आणि हळुहळु मग
येते वेळ कापणीची
पहा कणसे खुडाया-
बाई लाजऱ्या उषेची...!

## ४६. शेत जांभळे : वसंत दीक्षित

शेत जांभळे आजून डुलते
खळखळतो ग पाट रुपेरी
अजून कोकिळ आम्रतरूवर
अजून स्मरते सांज सुनेरी...

मोटेवरले गीत गुलाबी
विरले होते सावळतीला
कच्च्या खाउन कैऱ्या हिरव्या
आंबट होता ओठ जाहला...

सडा फुलांचा बकुळीखाली
वासंतिक मृदु स्वप्न धरेचे
करी विसवले तुझ्या नि माझ्या
भाव सुगंधी अन् हृदयाचे...

विहिरीवरच्या बसून काठी
विणले होते स्वप्निल धागे
दूर क्षितिजी नजरा रोखुन
म्हणालीस तू, " आठव हा घे..."

शीर्ण जाहली बकुळीमाला
अजून दरवळ लहरे ओली
सांज सलोनी अजून स्मरते
खळत्या पाटातुन न्हालेली.

# कवि-कवयित्री परिचय :

## १. मुकुंदराज

'विवेकसिंधु' या ग्रंथाचे कर्ते मुकुंदराज यांना मराठीचे 'आदिकवी' ही बहुमानाची पदवी दिलेली असली तरी त्यांच्या स्थळ-काळाविषयी बरीच मतमतान्तरे आहेत. परंतु साधारणतः ज्ञानेश्वरांच्या आधी शंभर वर्षे ते होऊन गेले असावेत, असे समजण्यात येते (शके १०५० ते ११२०).

'आत्मविज्ञान' या अमर स्वरूपाच्या विषयाचे सखोल विवेचन त्यांनी आपल्या 'विवेकसिंधू'त केले. अलंकारांच्या योजनेने त्यांनी अनेक ठिकाणी आपले कवित्व सिद्ध केले आहे. भक्तीला न्याय्य स्थान देणारा ज्ञानयोग त्यांनी आपल्या वाणी व लेखणीने सर्वत्र पसरवला. शाङ्कर मताचा त्यांनी प्रसार केला, असे मानण्यात येते. मुकुंदराजांचे अन्य ग्रंथ म्हणजे परमामृत, पवनविजय वगैरे होत.

## २. ज्ञानेश्वर

पैठणपासून आठ मैलांवर असलेल्या आपेगावी श्रीज्ञानेश्वरांचा जन्म श्रावण व. ८ शके ११९७ मध्ये झाला. ज्ञानदेवकालीन महाराष्ट्र हे एक सुखसंपन्न राष्ट्र होते. तेव्हा यादवांची राजवट चालू असून रामदेवराव यादव हा देवगिरी येथे राज्य करत होता. इ. स. १२९० मध्ये ज्ञानदेवांनी 'ज्ञानेश्वरी' नावाचा 'भगवत्गीते'वर आधारित स्पष्टीकरणात्मक ग्रंथ लिहिला. भक्ती आणि कर्मामुळेच मनुष्य दुःखातून सुखाकडे जाईल असे प्रतिपादन त्यांनी ज्ञानेश्वरीत केले.

अमृतानुभव, चांगदेवपासष्टी, आणि अभंगांची गाथा हे ज्ञानेश्वरांचे आणखी काही महत्त्वाचे ग्रंथ होत.

'पैल तो गे' या अभंग-कवितेत ज्ञानेश्वरांनी विठ्ठलाच्या भेटीची आर्तता दर्शवली असून 'पसायदान'मध्ये जगातील सर्व प्राणिमात्रांचे कल्याण चिंतिले आहे.

## ३. नामदेव

जन्म शके ११९२ मध्ये पंढरपूर येथे. लहानपणापासून विठ्ठलभक्तीकडे

ओढा. त्यांनी निर्माण केलेला भक्तिमार्ग हा परमार्थातील समतावादी असून जाणते व नेणते अशा सर्वांकरता आहे. त्यांनी आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात उत्तर हिंदुस्थानात भागवत धर्माचा प्रसार केला. शीखांच्या ‘ग्रंथसाहेब’ या धार्मिक ग्रंथात नामदेवाची ६१ पदे समाविष्ट केली असून ही सर्व हिंदीत लिहिलेली आहेत. नामदेवांचं हे कार्य महाराष्ट्राला गौरवास्पद आहे. नामदेवांनी एकूण २,५०० अभंग लिहिले. ‘नामदेव गाथा’मध्ये हे सर्व अभंग ग्रथित केले आहेत. वयाच्या ८१ व्या वर्षी म्हणजे शके १२७२ मध्ये त्यांनी पंढरपूर येथे देह ठेवला.

प्रस्तुतच्या ‘तूं माझी माऊली’ या अभंगात नामदेवांनी अनेक रूपके घेऊन ईश्वराचे थोरपण सांगितले आहे; ‘पतित पावन’ या अभंगरचनेत नामदेव ईश्वराशी प्रेमाचे भांडण करत आहेत.

## ४. तुकाराम

जन्म देहू गावात शके १५२० (सन १५९८). अवीट अभंगवाणी आणि समाजोन्मुख वृत्ती यामुळे तुकारामाच्या सर्वच अभंगांना आपलेपणाची झाक आलेली दिसून येते. त्यांच्या वाङ्मयास म्हणूनच सामाजिक अधिष्ठान प्राप्त झाले! प्रापंचिक दुःखातून मुक्त होण्यासाठी त्यांनी धरलेली भक्तिमार्गाची कास सामान्यातून असामान्यत्वाकडे जाणारी दीपिका वाटते! आणखी सखोलपणे म्हणावयाचे झाल्यास, वैयक्तिक व सामाजिक असंतोष हे त्यांच्या काव्याचे मूळ आहे, असे म्हणता येईल.

तुकारामांनी एकूण पाच हजार अभंग लिहिले. त्यांतील बहुतेक अभंगांतून बहुजनसमाजातील सर्वसामान्य व्यक्तींचे राग, द्वेष आणि आशा-आकांक्षा त्यांनी आत्मीयतेने बोलून दाखवल्या.

फाल्गुन वद्य २ शके १५७१ मध्ये तुकाराम सदेह वैकुंठास गेले.

येथे प्रस्तुतच्या अभंगातून तुकारामांनी लौकिक जीवनाची व्यर्थता यथार्थतेने दाखवली असून दीन-दलितांच्या सेवेत जगणे महत्त्वाचे आहे, हे सांगितले आहे.

## ५. जनाबाई

गंगाखेड येथील देना नावाच्या शूद्राची ही मुलगी. हिचे आयुष्य नाम-

देवाच्या घरी गेले. हिचे अभंगही नामदेवाच्या अभंगाबरोबरच आढळतात. जनाबाईच्या अभंगाची भाषा साधी व सोपी असल्यामुळे इतर तत्कालीन कवयित्रीं-पेक्षाही जास्त लोकप्रिय ठरली. भावनेबरोबरच कल्पनेचे सुमधुर प्राचुर्य जना-बाईच्या अभंगांत आढळते.

जनाबाईच्या अभंगांतून कल्पनाशक्तीच्या परिचयाबरोबरच स्त्रीच्या आर्त मनाची ओळख होते.

## ६. मोरोपंत

मोरोपंतांनी ' आर्या ' हे वृत्त मराठी काव्यातून अनेकदा वापरले; त्यात ते इतके निपुण झाले की, पुढे ' आर्या मयूरपंता 'ची असे समीकरणच होऊन बसले !

पंडिती काव्याचा खराखुरा बहर मोरोपंतांच्या काव्यामुळे तत्कालीन मराठी कवितेत दरवळू लागला. संस्कृतप्रचुर व सामासिक शब्दाची व्याप्ती त्या वेळी मराठी कवितेत भरपूर प्रमाणात होऊ लागली.

मोरोपंत मूळचे राहणारे बारामतीचे. त्यांचे काव्य विपुल असून ते सर्वसंग्रह व काव्यसंग्रह यांतून प्रकाशित झाले आहे. समग्र भारत, रामायण, भागवत, कृष्णविजय इत्यादी काव्ये व केकावली, संशयरत्नमाला इ. स्फुटकाव्ये, पदे त्यांनी केली आहेत.

प्रस्तुत ' केकावली 'मध्ये कवीने ईश्वराची नानाविध प्रकारे करुणा भाकली आहे. ' केकावली ' म्हणजे मयूराने फोडलेला आर्त टाहो ! या ठिकाणी स्वतः मोरोपंत मयूराप्रमाणे ईश्वराची आळवणी करत असून स्वतःचा उद्धार करण्याविषयी विनवीत आहेत.

## ७. रामजोशी

रामजोशींचे मूळ गाव सोलापूर. ' दो दिवसांची तनु ही साची ', ' सुंदरा मनामधि भरली ', ' बा, किती घालसी संसृतिचा पिंगा ' या त्यांच्या लावण्या अतिशय प्रसिद्ध झाल्या !

शीघ्रकाव्ये रचण्यात रामजोशींचा हातखंडा होता. प्रख्यात पंडित कवी मोरोपंत व रामजोशी यांचा दाट परिचय होता.

रामजोशींच्या लावण्यांतील दिलखुलास शृंगार ज्याप्रमाणे मनावर मोहिनी घालतो, त्याचप्रमाणे त्यांच्या वीररसाने युक्त अशा पोवाड्यांनी मनात आवेशही निर्माण होतो. सामाजिक दंभाची मनस्वी चीड त्यांच्या काही लावण्यांतून दिसून येते.

सदरची लावणी त्या वेळचा मठाधिपती मंबाजीबुवा व त्याच्या शिष्यपरिवाराच्या ढोंगीपणावर केलेला जळजळीत प्रहार आहे.

## ८. होनाजी बाळा

होनाजी बाळांच्या लावण्या ह्या इतर लावणीकारांच्या व शाहिरांच्या मानाने थोड्या सात्त्विक आहेत. प्रख्यात पंडिती कवी श्रीधर व मुक्तेश्वर यांची छाप त्यांच्या भूपाळ्यांवर सहज दिसून येते. त्यांनी आपल्या लावण्यांतून अनेक विषयांचे यथायोग्य चित्रण केले. मराठा शिपाईगडी, जंगल, लढाई, इत्यादींची वर्णने त्यांच्या लावण्यांतून येतात.

होनाजी बाळा हे तमासगीर असल्याने महाराष्ट्रातील अनेक गावांतून त्यांचा संचार होत असे. त्याचा परिणाम थोडाबहुत त्यांच्या भाषेवरही झाला. कऱ्हाडी, खानदेशी, कोकणी शब्दांचा वापर म्हणूनच त्यांच्या काव्यातून आढळून येतो.

प्रस्तुत भूपाळींत कवीने पहाटसमयीचे अतिशय मनोरम व प्रत्ययकारी वर्णन केले आहे.

## ९. महात्मा फुले

इ. स. १८२७ मध्ये महात्मा फुले यांचा जन्म झाला. इ. स. १८४१ ते ४७ पर्यंत मिशनरी शाळेतील माध्यमिक इंग्रजी शिक्षण पूर्ण केले. त्याच अवधीत टॉमस पेनचे ' राइटस् ऑफ मॅन ' हे पुस्तक त्यांच्या वाचनात आले. या पुस्तकाचा खोल परिणाम त्यांच्या मनावर झाला, आणि अस्पृश्यतावाद नष्ट झाला पाहिजे म्हणून ते प्रयत्नास लागले.

त्याच वेळी म्हणजे १८४८ मध्ये एका उच्चवर्णीय लग्नाच्या मिरवणुकीत झालेला अपमान त्यांना सहन झाला नाही. शूद्रातिशूद्रासाठी इ. स. १८४८ मध्ये त्यांनी मुलींची शाळा काढली. सबंध भारतातील स्त्री-शिक्षणाचा पहिला पाया अशा प्रकारे म. ज्योतीराव फुले यांनी रोवला. यामुळे समाजाचा रोष त्यांच्या-

वर झाला. स्वतःच्या सौभाग्यवतीसह त्यांना गृहत्याग करावा लागला. १८५१ मध्ये त्यांनी पुण्यातच आणखी दोन मुलींच्या शाळा स्थापिल्या. १८५२ मध्ये इंग्रजी शासनाने त्यांच्या शैक्षणिक कार्याबद्दल त्यांचा जाहीर सत्कार केला.

विधवा-पुनर्विवाह, बालहत्या-प्रतिबंध यांचा पुरस्कार त्यांनी केला. अस्पृश्यांसाठी स्वतःच्या घरचा हौद त्यांनी खुला केला. १८७६–८२ पर्यंत पुणे नगरपालिकेचे सभासद म्हणून कार्य. २० नोव्हेंबर १८९० रोजी मृत्यू.

म. फुले यांचे साहित्य : गुलामगिरी, शेतकऱ्याचा आसूड, सत्सार, इशारा, शिवाजीराजे यांचा पोवाडा, अंखडादी काव्यरचना.

## १०. केशवसुत

पूर्ण नाव : कृष्णाजी केशव दामले.

जन्म १५ मार्च १८६६ रत्नागिरीजवळ मालगुंड या गावात. वडिलांचा शिक्षकी पेशा. त्यामुळे प्राथमिक शिक्षण चांगल्या रीतीने पूर्ण. १८८२ मध्ये इंग्रजी शिक्षणासाठी बडोद्यास त्यांच्या वडील बंधूंकडे रवाना. आर्थिक कारणांमुळे कॉलेज शिक्षण अपूर्ण ठेवावे लागले.

लहानपणापासून प्राचीन कवींच्या कविता व जुन्या पुराण-पोथ्या इत्यादी वाचण्याचा छंद केशवसुतांना लागला होता. त्यामुळे काव्यरचनेकडे ओढा निर्माण झाला. इ. स. १८८९ च्या नोव्हेंबरमध्ये त्यांची पहिली कविता ‘ प्रीती ’ ही प्रकाशित झाली. त्याअगोदर काही इंग्रजी कवितांची भाषांतरे त्यांनी केली होती. इ. स. १८९० पासून स्वतंत्र काव्यनिर्मिती. निसर्ग, प्रेम यांचे कवितेत चित्रण. सामाजिक, जुन्या परंपरांविरुद्ध केशवसुतांनी सर्वप्रथम आपल्या कवितेतून आवाज उठवला.

शुद्ध, सफाईदार, निरलंकृत व नादमय भाषेने त्या वेळी त्यांची कविता लोकप्रिय झाली. यांची कविता भावना आणि विचारपूर्ण अशी आहे.

## ११. बालकवी

पूर्ण नाव : त्र्यंबक बापूजी ठोंबरे. जन्म १३ ऑगस्ट १८९० रोजी खानदेशातील धरणगावी. १९०२ पर्यंत मराठी शिक्षण पूर्ण केल्यानंतर इंग्रजी शिक्षणासाठी धुळे येथे जाऊन राहिले. १९०३ मध्ये नवापुरास त्यांनी पहिली कविता

लिहिली. १९०५–६ च्या सुमारास लोकजागृती व राष्ट्राभिमानासाठी अनेक ठिकाणी कीर्तने केली. १९०७ च्या जळगाव येथील पहिल्या महाराष्ट्र क्रांति-संमेलनात ' बालकवी ' ही पदवी त्यांना मिळाली.

बालकवींनी अनेक कविता नगर-पुण्यास लिहिल्या. निसर्ग हा त्यांच्या कवितांचा प्रमुख विषय असला तरी त्यांनी इतर विषयांवरही कविता रचल्या. मुलांच्यासाठी अनेक कविता लिहिल्या. त्यांच्या बहुतेक कविता भावोत्कट व हृदयस्पर्शी आहेत. निसर्गातील नानाविध रूपांचे मनसोक्त चित्रण त्यांनी केले. प्रखर कल्पना-शक्ती आणि स्फूर्तीचे सान्निध्य यामुळे त्यांच्या काव्यलेखनात जिवंतपणा सतत भासतो.

## १२. गोविंदाग्रज

पूर्ण नाव : राम गणेश गडकरी. नवसारी येथे जन्म.

एकच प्याला, प्रेमसंन्यास, वेड्यांचा बाजार, भावबंधन, पुण्यप्रभाव ही मराठी नाटके यांनी लिहिली. कथानकाची उत्कृष्ट गुंतागुंत, विनोदाचा सुंदर मुलामा, प्रसंगांची अप्रतिम गुंफण आणि अलंकारिक भाषा यांमुळे त्यांच्या नाटकांनी उच्चांकाचा कळस गाठला.

नाटककार म्हणून प्रसिद्ध होण्यापूर्वी गडकऱ्यांनी अनेक कविता व विनोदी लेख लिहिले होते. ' बाळकराम ' या नावाने विनोदी लेखन व ' गोविंदाग्रज ' या नावाने त्यांनी काव्यलेखन केले. समाजातील अनेक जुन्या-पुराण्या चालीरीतींचे विडंबन व उपहास त्यांनी आपल्या विनोदी लेखांत केले; तर मानवी मनातील प्रेमविश्वाची व्यथा त्यांनी आपल्या काव्यलेखनात साकार केली. ' वाग्वैजयंती 'त त्यांच्या सर्व कविता संग्रहित करण्यात आल्या आहेत.

अवघ्या ३४ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी केलेली साहित्यिक कामगिरी ही तोलाची व मोलाची आहे, यात वाद नाही. येथे प्रस्तुत कवितेत कवीने फुलाचे रूपक वापरून प्रत्येक व्यक्तीचे नशीब हे वेगवेगळे असते; तेव्हा निष्कारण खंत करण्यात अर्थ नाही, हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

## १३. भा. रा. तांबे

जन्म २७ नोव्हेंबर १८७४ मध्ये मुगावली या गावी. प्राथमिक शिक्षण झांशी

व मुगावली येथे. लहानपणी रामविजय, पांडवप्रताप वगैरे ग्रंथांची पारायणे. तुलसीदासांचे हिंदी रामायण बरेचसे पाठ केले. १८९३ मध्ये मॅट्रिकची परीक्षा पहिल्या श्रेणीत पास. पुढल्याच वर्षी देवासच्या राजपुत्रांसाठी शिक्षक म्हणून नियुक्ती. १८९६ मध्ये रतलाम येथे विवाह. १९०३ मध्ये सीनिअर देवासचे वकील म्हणून इंदूर येथे काम केले. पुढे प्रतापगढ, अजमेर येथील संस्थानिकांच्या निकटवर्ती नोकऱ्या.

इंदूर येथे असतानाच काव्यलेखनास सुरुवात. बायरन, शेली, टेनिसन, ब्राउनिंग वगैरे कवींचा अभ्यास. उत्कृष्ट व रसरशीत भावना, आटोपशीर व बांधेसूद रचना, आणि समुचित व समर्पक शब्दयोजना ही त्यांच्या भावगीताची प्रमुख अंगे होत. जन्म, मरण, प्रेम, आशा, निराशा वगैरे विषयांवर गूढगुंजनपर कविता. प्रेमकवितांची अधिक संख्या, आणि प्रेमातील मनोव्यापारांचे हृदयंगम दर्शन– म्हणून त्यांना ' प्रेमाचे शाहीर ' म्हटले जाते ! त्यांच्या कवितांतील प्रेमदर्शनातील विविधता लक्षणीय असते.

या संग्रहातील कविता ही १९७१ पर्यंत अप्रकाशित होती. प्रा. जवाहर मुथांच्या संशोधनाने सदर कवितेचे प्रथम प्रकाशन जानेवारी १९७२ च्या ' किर्लोस्कर ' मासिकात झाले. सदर कवितेत श्री. तांबे यांनी विरहदग्ध नायकाचे यथोचित चित्रण केलेले दिसून येते.

## १४. गिरीश

पूर्ण नाव : शंकर केशव कानेटकर, जन्म १८९३ मध्ये.

प्रकाशित पुस्तके : कांचनगंगा, फलभार व मानसमेघ या तीन संग्रहांत स्फुट कविता, आणि अभागी कमल, कला व आंबराई ही तीन खंडकाव्ये प्रकाशित.

ग्रामीण जीवनातील सुखदुःखाचे चित्रण त्यांच्या काव्यकृतीतून आढळते. सौम्य व संयमशील रचना, स्फुट कवितांमधून अनेक सामाजिक विषयांना प्राधान्य. आपल्या प्रतिभेच्या बळावर, सामान्य वैचारिक पातळीवर दीर्घ स्वरूपाची कथाकाव्ये लिहिली. तशा प्रकारच्या रचनेची परंपरा अत्यंत सोज्वळ स्वरूपात निर्माण केली. हे आणखी एक वैशिष्ट्य !

' सुंदर हिरवे माळ ' या कवितेत आषाढ-श्रावणातल्या निसर्गाचे वर्णन केले आहे.

## १५. यशवंत

पूर्ण नाव : यशवन्त दिनकर पेंढरकर. जन्म : १८९९.

रविकिरण मंडळातले प्रमुख कवी. यशवंती, यशोधन, भावमंथन, यशोगंध, यशोनिधी, ओजस्विनी, पाणपोई इत्यादी स्फुट कवितांचे संग्रह प्रकाशित. बंदीशाळा, काव्यकिरीट, जयमंगला ही खंडकाव्ये. अलीकडेच 'छत्रपती शिवराय' हे महाकाव्य प्रकाशित.

कमालीच्या आत्मपर प्रतिभेतून यशवन्तांच्या काव्य-विश्वाची निर्मिती झालेली स्पष्टपणे दिसून येते. विषण्णता आणि असहाय्यता या दोन्ही काठांनी त्यांच्या काव्य-सरितेचा प्रवाह वाहात गेलेला आढळून येतो. अत्यंत संस्कारक्षम अंतःकरणामुळेच केवळ हे शक्य आहे, हेही तितकेच खरे! अर्थसुलभता, सहज रचना व ओजस्वी भाषा ही त्यांच्या काव्याची आणखी काही वैशिष्ट्ये.

प्रस्तुत 'सरितेचे चरित्र' या कवितेत कवीने नदीच्या आत्मसंतुष्ट वृत्तीचे समर्थत करून मनुष्याने तिचे प्रतीक समोर धरून जीवन आक्रमिले पाहिजे, असे सुचवले आहे.

## १६. साने गुरुजी

पूर्ण नाव : पांडुरंग सदाशिव साने. जन्म : १८९९, मृत्यू १९५०.

अत्यंत हळुवार आणि संवेदनाक्षम अंतःकरणाच्या साने गुरुजींनी राष्ट्रीय व सामाजिक उत्थानाकरता ज्याप्रमाणे आपला देह झिजवला, त्याचप्रमाणे आदर्शवादी, प्रेमपूर्ण आणि जीवनवादी वाङ्मयाची निर्मिती करून स्वतःचे हृदयही राबवले.

श्यामची आई, धडपडणारी मुले, पुनर्जन्म, गोड शेवट, तीन मुले, संध्या इत्यादी पंधरा-सोळा कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. त्यांचे कादंबरीलेखन एक प्रकारे सात्त्विक प्रकृतीचे स्वप्नरंजन असले तरी त्यातील हृदयाला जाऊन भिडणारी आशयघन भाषा अतुलनीय आहे. 'पत्री' या काव्यसंग्रहात त्यांच्या समग्र कवितांचे संपादन करण्यात आलेले आहे. देशभक्तिपर व ईश्वरभक्तिपर कविताही त्यांनी लिहिल्या.

प्रस्तुत 'अश्रू' या कवितेत कवीने अश्रूंचे माहात्म्य वर्णून ते अतिशय मोलाचे आहेत, असे सांगितले आहे. अश्रूसारख्या छोट्या गोष्टीतून मोठ-मोठ्या अलौकिक गोष्टी मांडताना कवीने अश्रूचे अलौकिकत्व सिद्ध केले आहे!

## १७. ग. ल. ठोकळ

जानपद जीवन जानपद भाषेत चित्रित करण्याचा पहिला मान गिरीश व यशवन्त यांचा ! त्यानंतर श्री. ग. ल. ठोकळांनी 'सुगी' नावाचा (१९३३) एक प्रातिनिधिक संग्रह प्रकाशित केला. त्याशिवाय 'मीठभाकर' या त्यांच्या संग्रहात त्यांनी स्वतःची जानपद गीते समाविष्ट केली.

पददलित, पीडित व उपेक्षितांबद्दलच्या जातिवंत जिव्हाळ्यातून श्री. ठोकळांनी काही कादंबऱ्याही लिहिल्या. त्यांच्या सुखदुःखाचा प्रभावी कलात्मक आविष्कार ठोकळांच्या लेखणीने सतत घडवला.

श्री. ठोकळ सध्या पुणे येथील स्वतःच्या प्रकाशन व्यवसायात गर्क असतात.

'जात्यावरलं गाणं' या कवितेत श्री. ठोकळांनी ग्रामीण भागातील स्त्रियांच्या मनोवस्थांचे हृदयंगम चित्रण केलेले आढळून येते.

## १८. बहिणाबाई चौधरी

सुप्रसिद्ध कवी सोपानदेव चौधरी यांच्या या मातोश्री. शेतकरी कुटुंबातल्या, लौकिक अर्थाने खेडवळ, अडाणी असलेल्या या कवयित्रीच्या जीवनात जसा वैफल्याला मुळीच थारा नव्हता, तसाच कवनातही नाही ! मार्मिक व समर्पक दृष्टीने त्यांनी जीवनाकडे पाहिले. म्हणूनच त्यांच्या कवितेतही जिवंतपणा प्रत्यही जाणवतो ! मानवी मनाची अचूक मीमांसा, शब्दनिष्ठ विनोदावर तोलाचा व मोलाचा भर, सूचक रसनिर्मिती आणि हृदयस्पर्शी कारुण्य या सर्व गुणांमुळे त्यांच्या मराठमोळ्या शब्दातली मराठी कविता चमत्कृतिपूर्ण कल्पनेचे रेशमी वस्त्रही परिधान करते ! शालेय शिक्षणाच्या अभावाचा स्पर्शही त्यांच्या रसील्या काव्यातून कधी होत नाही, हे आणखी एक विशेष !

प्रस्तुत 'मन' या कवितेत बहिणाबाईंनी मानवी मनाचे सुरेख चित्रण केले आहे, जितक्या मार्मिकतेने तितक्याच दिलखुलासपणे !

## १९. वि. दा. सावरकर

जन्म १८८३. प्रख्यात क्रांतिकारक. लेखन– काळे पाणी (कादंबरी), संन्यस्त खड्ग, उत्तरक्रिया, उःशाप (नाटके), माझी जन्मठेप (आत्मचरित्र), निबंध-

लेखन वगैरे. ब्रिटिश साम्राज्यशाहीला भारतातून हुसकावून लावण्यासाठी पराकोटीचे व शर्थीचे प्रयत्न त्यांनी आपल्या क्रांतिमय कार्यांनी केले. क्रांतीचा आक्रोश व साहित्यातली सृजनता दोघांचा अनन्यसाधारण संयोग त्यांच्याच जीवनचरित्रात पाहावयास सापडतो. ' सागरा, प्राण तळमळला ', ' स्वतंत्रतादेवीचे स्तोत्र ' इत्यादी कवितांना अमाप प्रसिद्धी. सिंहगड, बाजी प्रभू यांच्यावरील पोवाडे तेजस्वी !

' आत्मबल ' कवितेत कवीने ध्येयाकरिता प्राणार्पण करण्यास सिद्ध होणाऱ्या वीराच्या अंतःकरणाचे समर्थ दर्शन घडविले आहे !

## २०. अनिल

पूर्ण नाव : आत्माराम रावजी देशपांडे. वास्तव्य : नागपूर.

आधुनिक मराठी कवितेला नव-समाजाभिमुख व प्रतिभासंपन्न वळण लावण्यात अनिलांचे विकासशील व्यक्तिमत्त्व बरेच कारणीभूत आहे. फुलवात, भग्नमूर्ती, पेर्तेव्हा, सांगाती इत्यादी काव्यसंग्रह प्रकाशित. ' निर्वासित चिनी मुलास ' आणि ' भग्नमूर्ती ' ही दोन खंडकाव्ये !

भावनात्मक जीवनोपयोगी तत्त्वज्ञानाचा पुरस्कार त्यांनी आपल्या कवितेतून केला. म्हणूनच त्यांची कविता ही जीवनवादी ठरते ! मुक्तछंदाला मराठी कवितेत गौरवाचे स्थान त्यांनीच मिळवून दिले. त्यांच्या स्वतःच्या आयुष्यातील प्रेमभावनेचा आविष्कार व त्याचा विकासही त्यांच्या कवितांतून सहज दिसून येतो.

' सांगाती ' या काव्यसंग्रहातून प्रस्तुत कविता घेतलेली असून त्यात कवीने आपल्या व्याकुळ मनाचे चित्रण केले आहे.

## २१. कुसुमाग्रज

पूर्ण नाव : वि. वा. शिरवाडकर. वास्तव्य : नाशिक.

तेजस्वी आणि दीप्तिसंपन्न आशयाच्या कविता निर्माण करून कुसुमाग्रजांनी मराठी कवितेची अंतर्बाह्य कलात्मक सजावट केली. १९३३ मध्ये त्यांचा ' जीवनलहरी ' हा पहिला काव्यसंग्रह प्रकाशित झाला. त्यानंतर १९४२ मध्ये दुसरा काव्यसंग्रह ' विशाखा ' प्रकाशित झाला. त्यांच्या कवित्वशक्तीचे परमोत्कर्षास पोहोचलेले लखलखणारे दिव्य-वैभव ' विशाखा 'तून मराठी

रसिकांस पाहावयास मिळाले. किनारा, मराठी माती, रसयात्रा वगैरे काव्यसंग्रह, व ययाति आणि देवयानी, दूरचे दिवे, कौंतेय, दुसरा पेशवा, वैजयंती, नटसम्राट इत्यादी नाटके लिहून कुसुमाग्रजांनी मराठी सारस्वतात आपले नाव, आपल्या कार्याप्रमाणेच अढळ केले.

सत्त्वसंपन्न जीवन, तल्लख कल्पकता, प्रसादपूर्ण व भव्योदात्त भाषाशैली, जिवंत भावना व मानव्यनिष्ठा, आणि क्रान्तदर्शी विचारांमुळे कुसुमाग्रजांच्या कविता चिर-आनंददायी ठरल्या आहेत.

'प्रीतीसाठी प्रीती' या कवितेत कवीने प्रेमाविषयीच्या आपल्या प्रांजल भावना व विचार स्पष्टपणे मांडले असून, परंपरावादी अंधश्रद्धेला फाटा दिला आहे.

## २२. पु. शि. रेगे

सुरुवातीस 'सुहृतचंपा' या टोपण नावाने काव्यलेखन. साधना व इतर कविता (१९३१), फुलोरा (१९३७), हिमसेक (१९४३), दोला (१९५०), दुसरा पक्षी (१९६९) इ. अनेक काव्यसंग्रह. यांच्या बहुतेक कविता 'सत्यकथा' नावाच्या मासिकातूनच प्रकाशित होत असतात. नवकाव्याच्या संदर्भात त्यांच्या कवितांचा आवर्जून उल्लेख होतो. अर्थप्रतीतीच्या दृष्टीने त्यांच्या काही कविता दुर्बोध व गूढ वाटतात, हे खरे आहे. क्लिष्ट असे तत्त्वचिंतनही कवितांतून आढळून येते. सौंदर्यवादी कविता त्यांच्या विशेष गाजल्या. मुक्तछंदातून कविता लिहून ज्या कवींना त्यास मान्यता मिळवून दिली त्यांपैकी एक! महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वर्धा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून कार्य!

## २३. बा. भ. बोरकर

जन्म ३० नोव्हेंबर १९१०. गोव्यातील कुडचडे या गावी.

शिक्षण: १९३६ साली टीचर्स डिप्लोमाची परीक्षा दिली. शिक्षक, पत्रकार, आकाशवाणीवर वाङ्मय संयोजक इत्यादी नात्याने व्यावसायिक कार्य. प्रतिभा, जीवनसंगीत, दूधसागर, आनंद-भैरवी, चित्रवीणा, इ. काव्यसंग्रह; मावळता चंद्र, भावीण इ. कादंबऱ्या; कागदी होड्या हा लघुनिबंध व इतर अनुवादित साहित्य प्रकाशित. गोमंतकीय मराठी भाषेतही स्वतंत्र कवितेची निर्मिती बोरकरांनी केली.

गेयता, कोमलता, लालित्य व माधुर्य ही त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये थोड्याफार

प्रमाणात सरस म्हणता येतील. सौंदर्याच्या आस्वादात रमणारा हा कवी निसर्ग-प्रतिमांचा मुक्त हाताने उपयोग करतो. गोमंतकीय निसर्गदृश्यांवर आधारलेली त्यांची सृष्टिगीते आणि समरसतेच्या अवस्थांमधून निर्माण झालेली सरस प्रणयगीते बोरकरांच्या खास कविता ठराव्यात.

'हिरवळ आणिक पाणी '– ही अशीच एक निसर्गपर कविता.

## २४. ग. ह. पाटील

श्री. ग. ल. ठोकळ यांच्याप्रमाणे श्री. ग. ह. पाटील यांनीही जानपदगीतांच्या क्षेत्रात आपला ठसा उमटवला. इ. स. १९३४ मध्ये त्यांच्या जानपदगीतांचा संग्रह ' रानजाई ' या नावाने प्रसिद्ध झाला. शेतकरी, कामकरी यांच्या सुख-दुःखाचे चित्रण त्यांनी ज्याप्रमाणे केले, त्याचप्रमाणे रानावनातील निसर्गदृश्यांचेही-चित्रण केले. नागर भाषेत सरस आणि वेधक जानपदगीते लिहिणारे श्री. पाटील यांनी लहान बालकांना आवडतील अशी काही शिशुगीतेही लिहिली. श्री. पाटीलांच्या ' लिंबोळ्या ' या काव्यसंग्रहातील कविता त्यांच्या कविमनाची साक्ष पटवतात.

## २५. ग. दि. माडगूळकर

ग. दि. माडगूळकर हे नाव माहीत नाही असा वाचक निदान महाराष्ट्रात तरी आढळणार नाही. सुधीर फडके यांनी आपल्या सुरेल स्वरात लोकप्रिय केलेले ' गीतरामायण ' ' गदिमा ' यांच्या असामान्य प्रतिभेची साक्ष देणारे काव्यच नव्हे, तर आदर्श जीवनभाष्य आहे. गीतरामायणाची लोकप्रियता व साहित्यिक श्रेष्ठता इतक्या उच्च दर्जाची आहे की, ' मराठीचे वाल्मिकी ' हा महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदारांनी त्यांचा केलेला गौरव सार्थ वाटतो.

महाराष्ट्र शासनाने ' मराठी कलावंतांचा प्रतिनिधी ' म्हणून त्यांना आमदार-पद दिले, भारत सरकारने ' पद्मश्री ' केले, पुणे विद्यापीठाने आपल्या विद्वज्जनसभेचा सभासद करून विद्वत्तेचा शिक्कामोर्तब केला. साहित्यातील आणि चित्रपटांतील अजोड कामगिरीबद्दल त्यांच्यावर गौरव–पुरस्कारांचा अक्षरशः वर्षाव झाला. त्यांनी कथा, संगीतिका, व्यक्तिचित्रे, कादंबऱ्या, नाटके लिहिली. अभिनय, नकला, कथा-कथन, भाषणे– सर्व काही केले. साहित्यसंमेलनाचे

अध्यक्षपद भूषविले. तीन वर्षांपूर्वी त्यांच्या आयुष्याचा सुवर्णमहोत्सव साजरा करताना प्रसिद्ध केलेले 'गदिमा साहित्य-नवनीत' सहज जरी चाळले तरी गदिमा म्हणजे प्रकांड सारस्वत, हे समीकरण अजिबात अतिशयोक्तिपूर्ण वाटत नाही.

## २६. मनमोहन

जन्म १९११. पुण्याचे रहिवासी. मराठी काव्यक्षेत्रातील कोणत्याही पंथात न शिरता स्वतःच्या बेहोषीत काव्यरचना करण्यात दंग असलेला कवी! १९४० पासून काव्यलेखनास सुरुवात. सुरुवातीपासूनच यांच्या कवितेने वेगळे वळण घेतले. कल्पनेच्या प्रचंड सामर्थ्याची जाणीव यांच्या कित्येक कवितांतून होते!

उद्धार, कॉलेजियन, सुनीतगंगा, कुहू-कुहू, आदित्य हे त्यांचे काव्यसंग्रह. त्याशिवाय अनेक दीर्घ काव्ये. कादंबऱ्याही लिहिल्या. चित्रकलेचीही अनावर हौस!

## २७. शांता ज. शेळके

सहज व सुश्लिष्ट रचना हा त्यांच्या प्रसन्न कवितेचा प्रथमदर्शनी मनात भरणारा प्रमुख विशेष! 'वर्षा' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह १९४७ मध्ये प्रकाशित. त्यातील बहुतेक कविता स्वप्नरंजनात्मक. प्रेम, निसर्ग आणि ईश्वर या तीन विषयांशी निगडित अशा त्यांच्या कविता प्रामुख्याने दिसून येतात. 'प्रीतिपथावर', 'नीहार' हे त्यांचे आणखी दोन संग्रह. 'नीहार'मधील प्रेमगीते भावस्निग्ध व अर्थगम्य! स्त्री-मनाचा उत्कट आविष्कार त्यांच्या कवितेतून जागोजाग प्रकट होतो.

'दुवा' ही कविता सत्यकथेच्या १९६७ च्या दिवाळी अंकामधून घेतलेली आहे. या कवितेवरून अगदी छोट्या वस्तूतूनही महानतम अर्थ आपल्या प्रगल्भ स्फूर्तीने काढणाऱ्या शांताबाईंचे कविमन सहज मोहवून जाते!

## २८. शिरीष पै

आचार्य अत्रे यांच्या कन्या. सध्या दै. मराठ्याच्या संपादिका, लघुकथा, नाटक व काव्य या प्रांतात लेखन. अलीकडेच प्रकाशित झालेला त्यांचा काव्यसंग्रह

म्हणजे 'पावसाळ्यातील कविता' हा महाराष्ट्र शासनाने त्यांच्या या संग्रहास पारितोषिक देऊन गौरव केला. लघुकथा, काव्यसंग्रह वगैरे मिळून ८–९ पुस्तके प्रकाशित. हळुवार मनाचे संवेदनाक्षम चित्रण हा. शिरीष पैंच्या कवितेचा प्रमुख विशेष. अर्थातील गहनतेमुळे शब्दांत आपोआप मार्ग काढून कवितेत येतात व आपल्या जागी स्थानापन्न होतात. शिरीष पैंच्या भाषा-सामर्थ्याचा हाही एक विशेषच !

## २९. विंदा करंदीकर

१९५० नंतरच्या मराठी कवितेत अंतर्बाह्य फरक दिसू लागतो, त्यातील एक सुजाण कवी विंदा करंदीकर. मर्ढेकरांच्या लोकविलक्षण काव्यकर्तृत्वाने ज्या कवींना भारावून टाकले, त्यांत करंदीकरांचे स्थान महत्त्वाचे. ध्रुपद, मृद्‌गंध, इत्यादी काव्यसंग्रह प्रकाशित. नव्या युगाची जाणीव काव्यातून ओतप्रोत देणारे कवी. स्वेदगंगा हा त्यांचा आणखी एक प्रकाशित काव्यसंग्रह. यथार्थ व उपहासगर्भ वर्णनसामर्थ्याची प्रतीती त्यांच्या कवितेतून उमटते. त्यांनी लिहिलेली शिशुगीतेही चटकदार आहेत.

## ३०. इंदिरा संत

बेळगाव येथील युनियन ट्रेनिंग कॉलेजच्या प्राचार्यपदी कार्य. १९४० साली 'सहवास' नावाच्या काव्यसंग्रहात त्यांच्या कविता प्रथमतः प्रकाशित झाल्या. त्यानंतर तब्बल दहा वर्षांनी म्हणजे १९५१ मध्ये 'शेला' हा संग्रह प्रकाशित. आतापर्यंत मेंदी, रंगबावरी वगैरे मिळून पाच काव्यसंग्रह प्रकाशित.

इंदिरा संतांच्या कवितांतून प्रीती व निसर्गाला प्रामुख्याने स्थान मिळालेले दिसून येते. त्यांच्या भावविश्वात भावनेला– कोमल, तरल व सखोल भावनेला विशेष प्राधान्य आहे. म्हणूनच त्यांची एकूण कविता जिवाला ओढ लावते.

## ३१. बाबा आमटे

'ज्वाला आणि फुले' या बाबा आमट्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहाने मराठीच्या काव्यप्रांताला एका नव्या तेजःपुंज विचारशील कवितेचा साक्षात्कार झाला. त्यातील बहुतेक कविता परिपक्व विचारांची क्रान्तदर्शी ओजस्विता प्रकट करते. स्वतः बाबा

आमटे सोमनाथ (जि. चांदा) येथे 'आन्तर भारती'च्या योजनेखाली भारतातील समग्र तरुणांच्या 'श्रमसंस्कार' छावण्यांतून आधुनिक युवक-मनाची घडण करण्यात दंग! महारोग्यांसाठीही अनेक परीने त्यांनी कार्य केले व करीत आहेत! बाबा आमट्यांच्या या समाजोपयोगी कार्याची दखल शासन व जनता एकाग्रतेने घेत आहे. मुंबईच्या 'सूर सिंगार संसद'ने त्यांच्या कवितेला नुकतेच पाचशे रुपयांचा पुरस्कार देऊन यथोचित गौरव केला आहे.

## ३२. मंगेश पाडगावकर

वास्तव समाजदर्शनापेक्षा निसर्गदर्शनात व त्या अनुषंगाने वैयक्तिक भावविश्वात श्री. मंगेश पाडगावकरांची प्रतिभा आत्मीयतेने व उत्साहाने रमलेली दिसून येते. वर्षाऋतू, जलधारा, सजलता यांचे विशेष आकर्षण त्यांना आहे. धारानृत्य, जिप्सी या त्यांच्या काव्यसंग्रहांतून वरील वैशिष्ट्ये प्रकर्षाने जाणवतात. विशुद्ध प्रेमभावनेचा निसर्गप्रतिमांच्या साहाय्याने त्यांनी केलेला आविष्कार हा मनोवेधक आहे. सौंदर्यवादी आणि आशावादी दृष्टिकोणाचा हा कवी जीवनाकडे दिलखुलासपणे पाहात असलेला. त्यांच्या 'विदूषक' या काव्यसंग्रहातील कवितेवरून दिसून येते.

सध्या श्री. पाडगावकर मुंबईत मराठीचे प्राध्यापक आहेत. त्यांच्या भावगीत-सदृश अनेक कविता ध्वनिमुद्रित झाल्या असून त्या लोकप्रियतेच्या शिखरावर आहेत.

## ३३. सरिता पदकी

महाविद्यालयीन जीवनापासून काव्यलेखनास सुरवात. शिक्षण एम्. ए. पर्यंत. अनेक इंग्रजी नाटकांची त्यांनी केलेली मराठी भाषांतरेही प्रकाशित. इंग्रजी व मराठी दोन्ही भाषांवर प्रभुत्व. 'चैत्रपुष्प' वगैरे काव्यसंग्रह प्रसिद्ध. लहान मुलांच्यासाठीही काव्य-लेखन. 'साधना' साप्ताहिकाच्या बालविभागाचे त्याच संपादन करतात. निरलसपणे अनुभवावर अधिष्ठित अशी त्यांची कविता रसिकांस पुनःप्रत्ययाचा आनंद सहजपणे आणून देते!

## ३४. प्रफुल्ल दत्त

नाव : दत्तात्रय विष्णु तेंडुलकर. अध्यापकीय पेशा. अनेक पुस्तके प्रकाशित. बोधिवृक्षाच्या छायेत, डोळ्यांचे निरांजन, तपोवनातील दुर्वा वगैरे पुस्तके गाजली. शिक्षण– एम्. ए., बी. टी.

## ३५. यशवन्त भिमाले

सध्या पुण्याच्या कृषी महाविद्यालयात हिन्दी व मराठीचे प्राध्यापक. यापूर्वी पुणे, सातारा व नगर जिल्ह्यांतील कला व वाणिज्य महाविद्यालयांमधून हिन्दी–मराठीचे प्राध्यापक म्हणून कार्य केले. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेच्या रा. भा. पंडित व रा. भा. पद्म या सर्वोच्च परीक्षांचे अधिकृत व नियमित मार्गदर्शक.

एम्. ए. परीक्षेत हिन्दी विषयात पुणे विद्यापीठात सर्वप्रथम. बी. ए. (ऑनर्स)ला हिन्दी विषयाचे पारितोषिक. एम्. ए.पर्यंत भारत सरकारची हिन्दीच्या अध्ययनार्थ खास गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळाली.

महाराष्ट्र-म्हैसूर संयुक्त कथा-कथन स्पर्धेत (१९७१) दोनशे रुपयांचा गौरव पुरस्कार. केन्द्रीय अनुवाद स्पर्धेत (१९७१). विशेष नैपुण्य प्रमाणपत्र. हिन्दी, मराठी, इंग्रजी, उर्दू, कानडी व तेलगू, या सहा भाषा अवगत.

१९६३ मध्ये 'शिल्प' काव्यसंग्रह संपादित. १९७२ मध्ये 'परोपकारी हातिम' प्रकाशित. सातारा जिल्ह्यातील 'साहित्य-सुधा' त्रैमासिकाचे माजी संपादक. अनेक कविता, विविध ललित स्फुट लेख अनेक साप्ताहिकांतून, मासिकांतून व दिवाळी अंकांमधून प्रसिद्ध झाले आहेत. आकाशवाणीवरून हिन्दी, मराठी व इंग्रजीमधून भाषणे ध्वनिक्षेपित. काव्यसंग्रह ('पंचम्') व कथा-संग्रह (साहसकथा) प्रकाशनाच्या वाटेवर. 'माहेर' कविता 'शिल्प' या काव्यसंग्रहातून घेतली आहे.

## ३६. गोपाळ किराणे

सध्या मुंबई येथे छबिलदास विद्यालयाचे मुख्याध्यापक. आपला कार्यभार सांभाळून प्रकाशकीय व्यवसायात गर्क. वीसपेक्षा अधिक पुस्तके प्रकाशित. लालबहादुर शास्त्री (सात आवृत्त्या), हे व्यर्थ न हो बलिदान (तीन आवृत्त्या),

वगैरे पुस्तकांचे लेखक. आपल्या तरुण वयापासून काव्यलेखनास सुरुवात. अनेक कविता प्रमुख नियतकालिकांतून प्रकाशित. लवकरच एक काव्यसंग्रह प्रकाशनाच्या मार्गावर. शिक्षण– एम्. ए., एम्. एड्.

## ३७. वसंत बापट

'भारत-दर्शन' व 'महाराष्ट्र-दर्शन' या दोन कार्यक्रमांमुळे भारतभर गाजलेले कवी वसंत बापट यांची कविता ही समाजोन्मुख, आशावादी, आदर्शवादी तर आहेच,– पण शाहिरी थाटाची आहे.

संस्कृत व शाहिरी वाङ्मयाची दाट छाया त्यांच्या कवितेवर सर्वत्र विखुरलेली आहे. शैलीची सफाई, नादमयता ही त्यांच्या काव्याची आणखी काही वैशिष्ट्ये!

सेतू, बिजली, अकरावी दिशा वगैरे त्यांचे काव्यसंग्रह खूप गाजले.

प्रस्तुत कवितेत कवीने समग्र भारताची मंगल कामना व्यक्त केलेली आहे. स्वप्नातले चित्र व वास्तव चित्र यांमुळे कवीचे विदीर्ण झालेले मन या ठिकाणी स्पष्ट दिसते.

सध्या वसंत बापट मुंबईच्या महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्य करतात.

## ३८. मधुकर केचे

अमरावतीच्या राजमहाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक.

दिंडी गेली पुढे, पुनवेचा थेंब, इत्यादी काव्यसंग्रहांनी अचानक पुढे आले. सुरुवातीस काव्यलेखन; नंतर गद्य व चरित्रपर लेखन. अभंगांतून केलेली काव्यरचना अधिक मनाला भिडणारी. त्यांच्या काव्यातील आर्तता आणि विचारवैभव मनाला प्रसन्न करून टाकणारी व नाविन्यपूर्ण.

या संग्रहातली त्यांची कविता 'दिंडी गेली पुढे' या काव्यसंग्रहातून घेतली आहे. मीलनापेक्षा प्रतीक्षा बरी, असे म्हणणारे केचे नव्या जाणिवेत रंगून गेलेले आहेत; त्यांचे दर्शन या कवितेतून सहज होते.

## ३९. जवाहर मुथा

सध्या धुळयाच्या कृषी महाविद्यालयात हिंदी व मराठीचे प्राध्यापक म्हणून कार्य. हिंदी व मराठी या विषयांतून स्वतंत्ररीत्या एम्. ए.

१९६६ मध्ये त्यांचा 'सूर्यतनू' हा काव्यसंग्रह प्रकाशित. त्याअगोदर 'साद' नावाचा काव्यसंग्रह संपादित.

'लोकयुग', 'लोकशक्ती' या साप्ताहिकांचे उपसंपादक म्हणूनही कार्य केले. 'मिलिंद' नावाच्या पाक्षिकाचे ते संपादक होते. किर्लोस्कर मासिकांच्या संपादकीय व प्रशासकीय खात्यात काही दिवस कार्य! 'लहर' या अनियतकालिकेचे संपादन! महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषदेच्या बेळगाव येथे भरलेल्या संमेलनात काव्यसंमेलनाचे अध्यक्षपद.

जवाहर मुथांच्या कवितांतून प्रीतीची भावना व त्या भावनेच्या नानाविध तरल छटा मनोरमतेने दिसून येतात.

'पाखरांचे गीत' ही कविता 'साधने'च्या दिवाळी अंकातून (१९७१) घेण्यात आली आहे.

## ४०. सुरेश भट

सुरेश भटांचे वास्तव्य अमरावतीला असते. 'तरुण भारत'चे प्रतिनिधी म्हणून अनेक वर्षे काम. त्यामुळे पत्रकाराचा व्यवसाय. उर्दू शायरीतील 'दर्द' सुरेश भटांच्या कवितेत प्रामुख्याने जाणवतो. गझलसदृश्य रचनेमुळे कवितेत लयकार निर्माण होतो! 'दुःख' हा त्यांच्या कवितेचा स्थायीभाव म्हटला तरी चालेल. आतापर्यंत पन्नासेक कविता प्रकाशित, त्यातच एक काव्यसंग्रहही जमा.

## ४१. नारायण सुर्वे

सध्याच्या मराठी कवितेचे एक अग्रणी कवी. ऐसा गा मी ब्रह्म, माझे विद्यापीठ, हे दोन काव्यसंग्रह प्रकाशित. सध्या मुंबई महापालिकेच्या प्राथमिक शाळेत शिक्षक.

नारायण सुर्व्यांची कविता ही वास्तववादी आहे; पण विशेष महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या कवितांतून दलित वर्गाची दशा विकलतेने दिसून येते.

'माझे शब्द' या कवितेत कवीने दलितांचे वास्तविक मन चितारण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला दिसून येईल.

## ४२. पद्मा गोळे

जन्म : १९१३.

लौकिकी अपेक्षेच्या अनुरोधाने 'काव्यरचना' करण्याची परंपरा यांनी मोडली. १९३५ पासून काव्यलेखनास सुरुवात, १९४० मध्ये 'प्रीतीपथावर' हा काव्य-संग्रह प्रकाशित. नीहार, स्वप्नता हे आणखी काव्यसंग्रह. सार्थ पण संयमित शब्दात भावनेचा आविष्कार, हा त्यांच्या कवितेचा एक मोठा विशेष.

सध्या वास्तव्य पुण्यामध्ये. काव्याप्रमाणेच नाट्य, कथा, ललित निबंध वगैरे क्षेत्रांतले लेखन कार्य.

## ४३. विद्या परचुरे

जन्म १९२५. शालेय शिक्षण भावे स्कूल, पुणे. महाविद्यालयीन शिक्षण फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे. मुंबई विद्यापीठातून इंग्रजी विषय घेऊन एम्. ए. नागपूर व पुणे येथील कृषी महाविद्यालयात दीड तपाहून अधिक काळ इंग्रजीच्या प्राध्यापिका. समाजकार्याची आवड. काव्यरचनेचा छंद. आदर्शवादी दृष्टिकोण. बहुतेक रचना प्रासंगिक. सध्या महात्मा फुले कृषी विद्यापीठ (राहुरी) येथे डेप्युटी रजिस्ट्रार या पदावर कार्य करीत आहेत.

## ४४. श्रीयुत दत्तप्रसन्न कारखानीस

जन्म : २६ ऑगस्ट १९०८.

दादर, मुंबई, येथील सुप्रसिद्ध किंग जॉर्ज मुलींच्या हायस्कूलमधून उप-प्रमुख म्हणून काम करून यंदाच निवृत्त झाले. महाराष्ट्रातील अनेकविध मासिकांमधून व प्रातिनिधिक काव्यसंग्रहातून यांच्या कविता वेळोवेळी प्रकाशित झाल्या आहेत. आचार्य अत्रे यांच्या प्रदीर्घ प्रस्तावनेसह यांच्या निवडक कवितांचा संग्रह 'क्षितिजावर' या अभिधानाने सन १९३५ मध्ये प्रकाशित झाला. यांच्या काव्यकृतीविषयी कै. अत्रे म्हणतात : "श्रीयुत कारखानीस यांच्या कवित्व-शक्तीचे निरनिराळे उन्मेष साकल्याने लक्षात घेता असे म्हणता येईल की, त्यांच्या कवितेते भावनेचा जिव्हाळा, कल्पनेचे नाविन्य, भाषेचा प्रसाद व रचनेचे माधुर्य हे गुणविशेष प्राचुर्याने आढळून येतात." यांच्या ५०–६० नवीन कवितांचा संग्रह लौकरच प्रकाशित होणार आहे.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
७९८६६ काव्य
2993 2.2.7

## ४५. विजय सुराणा

जन्म : १९४२. शालेय शिक्षण महात्मा गांधी विद्यालय, करमाळा. स. प. महाविद्यालयातून इंग्रजी विषय घेऊन उच्च श्रेणीत बी. ए. ( ऑनर्स ) उत्तीर्ण. नंतर कायद्याची परीक्षा उत्तीर्ण. एम्. पी. एस्. सी. तर्फे डेप्युटी कलेक्टरपदासाठी निवड. सहकार विभागात साहाय्यक निबंधक म्हणून जवळ जवळ अर्ध तप सेवा. सध्या महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक, मुंबई, येथे ग्रेड वन ऑफिसर म्हणून कार्य करीत आहेत. अनेक रचना प्रकाशित.

शिक्षण : बी. ए. ( ऑनर्स ), एल्एल्. बी., एच्. डी. सी.

## ४६. वसंत दीक्षित

सध्या अनेक वर्षांपासून अहमदनगर महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक. ' झुकलेलं चांदणं ' हा काव्यसंग्रह प्रकाशित. त्याशिवाय अनेक कविता प्रकाशात. हळुवारपणे भावनेला स्पर्श करून प्रसन्नता निर्माण करावयाची– हा त्यांच्या कवितेचा एक विशेष !

REFBK-0018593
REFBK-0018593